रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३३२
www.ramprahar.com

◆ शनिवार, २० जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

वन्यजीवांची शिकार करणारी टोळी जेरबंद/२
मृग सरले अन् पाऊस हरवला!/५
अक्षरा गुप्ताने वनडेमध्ये त्रिशतकासह रचला इतिहास/८

## विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद

**मुंबई :** येत्या सोमवार (दि. २२)पासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधान मंडळाच्या पावसाळी



अधिवेशनासाठी विधान भवन प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता विधान भवनात प्रवेश करण्यासाठी वापरले जाणारे पारंपारिक छापील पासेस पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. त्याऐवजी पीठासीन अधिकाऱ्यांपासून ते मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, अधिकारी, कर्मचारी, स्वीय सहायक आणि अभ्यागत अशा सर्वांनाच आता ई-प्रवेश प्रणाली अंतर्गत चेहरा पडताळणी पद्धतीद्वारेच प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयातर्फे देण्यात आली. अधिवेशन काळात विधान भवन परिसरामध्ये होणारी अवाढव्य गर्दी नियंत्रित करणे आणि सुरक्षा यंत्रणेवरील तपासणीचा ताण कमी करून सुलभता आणणे हा या सुविधेमागील सरकारचा मुख्य हेतू आहे.

# संरक्षण सज्जतेसाठी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे नागपूरमध्ये प्रतिपादन

**नागपूर : प्रतिनिधी**

देशाला भविष्यात संरक्षणसज्ज ठेवायचे असेल तर संरक्षण क्षेत्राशी संबंधित अत्यावश्यक गरजांवर स्वतःचे नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टीने यंत्र इंडियाचा अत्याधुनिक ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्प भारताचे आयात अवलंबित्व कमी करून देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने अत्यंत महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी (दि.१९) येथे व्यक्त केला.

यंत्र इंडिया लिमिटेडच्या अंबाझरी आयुध निर्माणीतील १० हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक ॲल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेस प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमात संरक्षणमंत्री सिंह बोलत होते. या कार्यक्रमास



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती होती. त्याचप्रमाणे संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीव कुमार, संयुक्त सचिव गरिमा भगत, यंत्र इंडिया लि.चे सीएमडी विजय कुमार अय्यर यांच्यासह संरक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या प्रकल्पाच्या माध्यमातून संरक्षण, एरोस्पेस, विमाननिर्मिती, क्षेपणास्त्र कार्यक्रम, रेल्वे आणि इतर धोरणात्मक क्षेत्रांसाठी आवश्यक असलेल्या उच्च दर्जाच्या ॲल्युमिनियम मिश्रधातूंच्या निर्मितीला मोठी चालना मिळेल आणि देशाच्या संरक्षण क्षमतेत मोठी भर पडेल, असे संरक्षणमंत्री सिंह यांनी सांगितले.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आत्मनिर्भरतेकडे देशाने एक सक्षम पाऊल टाकले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत असे दोन मंत्र आपल्याला दिले आहेत. विकसित भारताकडे वाटचाल करायची असल्यास आत्मनिर्भर भारत विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या देशाने आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल सुरू केली आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे समाजकारण नव्या पिढीसाठी आदर्शवत

## केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याकडून शुभेच्छा!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी थोर दानशूर व्यक्तिमत्त्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आणि त्यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'रामपर्व' या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनाबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. यासंदर्भात त्यांनी शुभेच्छापत्र पाठवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाचा गौरव करीत उत्तम आरोग्य, निरामय आणि उदंड आयुष्य लाभो, अशा शब्दांत त्यांचे अभीष्टचिंतन केले आहे.





शुभेच्छा संदेशात केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटले आहे की, अत्यंत सामान्य आणि मर्यादित साधनसंपत्ती असलेल्या कुटुंबात जन्म घेऊन केवळ अथक परिश्रम, जिद्द, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीच्या बळावर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजकारण, राजकारण, शिक्षण, उद्योग-व्यवसाय आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा त्यांचा ध्यास, समाजकारणातील निष्ठा, शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि जनकल्याणासाठी केलेले अविरत प्रयत्न हे सर्व गुणधर्म 'रामपर्व' या ग्रंथाच्या प्रत्येक पानातून समोर येत असून हा ग्रंथ तरुण पिढीसाठी नेतृत्व, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण म्हणून मार्गदर्शक ठरेल.

पुढे ना. गोयल यांनी शुभेच्छापत्रात नमूद केले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन वेळा संसदेत जनतेचे प्रतिनिधित्व करताना शेतकरी, श्रमिक आणि स्थानिकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडली व अनेक प्रश्नांचे पालकत्व घेऊन ते मार्गी लावले. राजकारण म्हणजे केवळ सत्ताकारण नसून "माणसं जोडण्याची कला" आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. कोरोनाच्या कठीण काळात हातावर पोट असलेल्या असंख्य कुटुंबांसाठी त्यांनी केलेले कार्य आणि आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा समाजकार्यासाठी अर्पण करणारा त्यांचा दानशूर स्वभाव नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श आहे. सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, साहित्य, कला, संस्कृती आणि आरोग्य या सर्व क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य म्हणजे समाजासाठी दीपस्तंभ आहे.

रयत शिक्षण संस्थेशी आणि कर्मवीरांच्या विचारांशी जोडलेली त्यांची नाळ, आदिवासी व मागास भागातील विद्यार्थ्यांसाठी उभारलेली शैक्षणिक पायाभूत सुविधा, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससारखी क्रीडासंरचना तसेच साहित्य-कला क्षेत्राला भक्कम आधार देणारे त्यांच्या विविध उपक्रमांचे जाळे हे सर्व त्यांच्या व्यापक सामाजिक दृष्टीचे द्योतक आहे. समाजोपयोगी उपक्रमांतून त्यांची सर्जनशील दूरदृष्टी दिसून येते.

याचबरोबर ना. गोयल यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली आहे तसेच 'रामपर्व' हा ग्रंथ केवळ वाचनाचा आनंद देणारा चरित्रग्रंथ न राहता नेतृत्व, प्रामाणिकपणा, सेवाभाव, पक्षनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांचे जिवंत उदाहरण म्हणून तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करून या ग्रंथाच्या निर्मितीत योगदान देणारे लेखक, संपादक, संशोधक आणि प्रकाशक यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.

**प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना**

# देशभरातील पात्र लाभार्थ्यांना निधीचे वितरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रोजगारनिर्मिती, आर्थिक समृद्धी आणि सामाजिक सुरक्षा मजबूत करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना (पीएमव्हीबीआरवाय) अंतर्गत ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निधी संघटना प्रोत्साहन वितरण समारंभ शुक्रवारी (दि.१९) आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त देशभरात विविध ठिकाणी कार्यक्रम झाले.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रीय कार्यक्रमात



पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी झाले होते. या कार्यक्रमादरम्यान पीएमव्हीबीआरवाय अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सुमारे २,४०० कोटी रुपयांचे लाभ वितरित करण्यात आले. पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेबाबत जनजागृती करण्यासाठी देशातील प्रमुख औद्योगिक आणि रोजगार केंद्रांमध्ये सुमारे २०० समांतर कार्यक्रम झाले. यावेळी नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरणही करण्यात आले. महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, अकोला, अमरावतीसह सात ठिकाणी लाभ वितरणाचा विशेष कार्यक्रम झाला.

भारत सरकारने पीएमव्हीबीआरवाय योजना सुरू केली आहे. ही योजना पूर्वी रोजगार संलग्न प्रोत्साहन (एएलआय) योजना म्हणून ओळखली जात होती. अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांमध्ये विशेषतः उत्पादन क्षेत्रावर विशेष भर देऊन रोजगार निर्मितीला चालना देणे, रोजगारक्षमता वाढवणे आणि सामाजिक सुरक्षा व्याप्तीचा विस्तार करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. योजनेच्या अंतर्गत ईपीएफओकडे नोंदणीकृत असलेले आणि दरमहा एक लाख रुपयांपर्यंत वेतन मिळवणारे नव्याने कामावर रूजू झालेले कर्मचारी एका महिन्याच्या वेतनाइतके जास्तीत जास्त १५ हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान दोन हप्त्यांमध्ये मिळण्यासाठी पात्र आहेत.

## भिवंडीत ६० जणांना विषबाधा

**भिवंडी : प्रतिनिधी**

भिवंडी परिसरातील खंडू पाडा रोडवरील एका प्रसिद्ध दुकानातून शोरमा आणि पिझ्झा खाल्ल्यानंतर अनेकांना विषबाधा झाल्याची घटना घडली. त्यामुळे १० ते १२ जणांना गुरुवारी रात्री इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता या आकड्यात वाढ होत असून सध्या रुग्णालयात ६० रुग्ण दाखल आहेत.

उलटी, जुलाब आणि पोटदुखीच्या त्रासामुळे या सर्वांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षकांनी दिली.

## निवडक

### उरणमध्ये २.५६ लाखांचे हेरॉईन जप्त, तरुणाला अटक

**उरण :** येथील पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने स्वातंत्र्यवीर क्रीडा मैदान (लाल मैदान) परिसरात टाकलेल्या छाप्यात सुमारे दोन लाख ५६ हजार रुपये किमतीचे ६.४० ग्रॅम हेरॉईन जप्त केले आहे. याप्रकरणी करंजा-चाणजे येथील मोहम्मद हुसैन अक्रम शेख (३३) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

### रील स्टार रोहिणी पाराध्ये आत्महत्येप्रकरणी पतीवर गुन्हा

**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथील हॉटेल ग्रामपंचायतची मालकीण तथा रीलस्टार रोहिणी पाराध्ये हिच्या आत्महत्येप्रकरणी पती निलेश विलास पाराध्ये याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. रोहिणीच्या वडिलांनी तिचा पती निलेश हा घरगुती कारणावरून तसेच इच्छा नसताना तिला हॉटेलमध्ये काम करण्यास लावून भांडण करायचा. मारहाण, शिवीगाळ, दमदाटी करून शारिरीक व मानसिक त्रासही देत होता, असा आरोप केला आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# विजेच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करा

## आमदार महेश बालदी यांचे बैठकीत अधिकाऱ्यांना निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, उरण आणि खालापूर तालुक्यातील वीज समस्यांबाबत आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने शुक्रवारी (दि.१९) आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी परिसरातील वीज समस्या सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध असून या कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही दिली.

सातत्याने खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात बैठक झाली. त्यावेळी आमदार महेश बालदी बोलत होते.

या बैठकीत विविध भागांतील वीज समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली, तर उपस्थित सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी वीज कंपनीच्या कारभाराविषयीच्या तक्रारी व



अडचणी थेट मांडल्या. यावेळी खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी प्रामुख्याने आदिवासी भागातील वीज समस्या तातडीने दूर करण्याची मागणी केली. बैठकीत वीजपुरवठा खंडित होण्यामागे अपुरे कर्मचारी हेही एक मुख्य कारण असल्याचे समोर आले तसेच प्रीपेड व स्मार्ट मीटरच्या विषयावरही चर्चा झाली.

आमदार महेश बालदी यांनी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचे प्रश्न ऐकून घेत उपस्थित महावितरणच्या अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करत कामे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीला रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, पनवेल पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, भाजपचे खालापूर तालुका मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, उरण ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, शहर अध्यक्ष कौशिक शाह, उरण नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, भाजपचे केळवणे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष विद्याधर जोशी, वडगाव जिल्हा परिषद अध्यक्ष महादेव गडगे, अतुल घरत, सदाशिव वास्कर, महेश कडू, चौकचे माजी उपसरपंच गणेश कदम, विजय ठोसर, महावितरणच्या भांडुप विभागाचे मुख्य अभियंता संजय पाटील, कार्यकारी अभियंता दिवाकर देशमुख, उपकार्यकारी अभियंता अमित कुरुंगळे यांच्यासह सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

# रायगडात तीव्र उष्णतेमुळे शाळांचे वेळापत्रक बदलले

## ३० जूनपर्यंत सकाळच्या सत्रातच वर्ग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सध्या जाणवत असलेल्या तीव्र उष्णता आणि दमट हवामानाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा विचार करून जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यानुसार १९ ते ३० जून या कालावधीत जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शाळा व अंगणवाड्या दुपारच्या सत्राऐवजी सकाळच्या सत्रात भरविण्यात येणार आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वेळापत्रक तात्पुरते बदलण्याचे आदेश दिले आहेत. वाढत्या उष्णतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अनेक भागात तापमानासोबतच दमट हवामानाचा प्रभाव वाढला असून दुपारच्या वेळेत



विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना त्रास होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा उपाय करण्यात आला आहे. शाळा व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी या बदललेल्या वेळापत्रकानुसार सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

यासोबतच विद्यार्थ्यांनी पुरेसे पाणी पिणे, डोक्याचे संरक्षण करणे, उष्णतेपासून सावध राहणे आणि आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे. जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना उष्णतेपासून दिलासा मिळणार असून शैक्षणिक कामकाजही सुरळीत सुरू राहण्यास मदत होणार आहे.

# मुंबईत रात्री समुद्रकिनाऱ्यांवर बिछाने

## उकाड्यापासून बचावासाठी नागरिकांचा कुटुंबासह मुक्काम

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील समुद्रकिनारे कायमच नागरिक आणि पर्यटकांमुळे गजबजलेले असतात, मात्र सध्या मुंबईतील काही समुद्रकिनारी रात्रीच्या वेळी अनेक नागरिक झोपण्यासाठी येत असल्याचे मागील काही दिवसांपासून दिसत आहे.

वर्सोवा हा मुंबईतील प्रसिद्ध समुद्रकिनाऱ्यांपैकी एक आहे. तेथे कायम नागरिकांची गर्दी असते. याच किनाऱ्यावर सध्या रात्रीच्या वेळी नागरिक झोपण्यासाठी म्हणून अंथरूण-पांघरूण घेऊन येत असल्याचे दिसत आहेत. वाढती उष्णता, लांबलेला मान्सून तसेच रात्रीच्या वेळीही उकाड्यात झालेली वाढ यामुळे हे नागरिक थंडाव्यासाठी समुद्रकिनारी झोपण्यास येत असल्याचे बोलले जात आहे.

मुंबईत यंदा हवामान बदलाचे परिणाम तीव्र होताना दिसत आहे. शहरात आणि उपनगरात मागील काही काळापासून उष्ण आणि दमट वातावरण कायम असून तापमानाचा पारा ३५ अंशांवर आहे. त्यामुळे दिवसा नागरिकांना उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत.

दरम्यान, पुढील काही दिवसांत मान्सूनच्या



पुढील वाटचालीसाठी हवामान अनुकूल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे तसेच मुंबईसह राज्याच्या कोकण किनारपट्टीवर २४-२५ जूनच्या आसपास पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान केंद्राकडून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे लवकरच मुंबईकरांना उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळेल, अशी आशा आहे.

# अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा पाठ्यक्रम अनिवार्य

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सीचालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सीचालकांनी चार तासांचा मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. १५ ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी सरकारने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फत चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे.

# कशेडी घाटात भरदुपारी पाठलागाचा थरार!

## खैराची वाहतूक करणारे वाहन वनविभागाने पकडले

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूरजवळील कशेडी घाटात खैर लाकडांची वाहतूक करणारे पिकअप वाहन गुरुवारी (दि.१८) भरदुपारी गुंगारा देत निसटून जात होते. ते पाठलाग करून पकडण्यात वनविभागाला यश आले आहे. या कारवाईत अंदाजे एक लाख रुपयांची खैराची लाकडे आणि सुमारे नऊ लाख रुपये किमतीचे वाहन जप्त करण्यात आले आहे.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार गुरुवारी दुपारच्या सुमारास कशेडी घाटातील वनविभागाच्या तपासणी नाक्यावर पांढऱ्या रंगाचे पिकअप वाहन (एमएच ०८ एपी ६७९४) थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र चालकाने वाहन न थांबवता पळ काढण्याचा



प्रयत्न केला. त्यानंतर वनविभागाच्या पथकाने पाठलाग करून हे वाहन ताब्यात घेतले. तपासणीदरम्यान वाहनामध्ये खैराची लाकडे आढळून आली. प्राथमिक चौकशीत ही लाकडे पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यातील वेल्हे परिसरातून रत्नागिरी जिल्ह्याकडे नेली जात असल्याचे समोर आले आहे.

याप्रकरणी शुभम मोरे (रा. घोडेगाव, ता. चिपळूण) आणि अजित मोरे (रा. जेजुरी, पुणे) यांच्याविरोधात वन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेले वाहन आणि खैराची लाकडे वनविभागाच्या ताब्यात असून जप्त मुद्देमाल माणगाव येथील वन विभागाच्या डेपोमध्ये जमा करण्यात आला आहे. अधिक तपास वनक्षेत्रपाल आशिष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# योग साधनेतून अन्वीची दिव्यांगाच्या मर्यादेवर मात; मुख्य सचिवांच्या हस्ते गौरव



**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित 'रबर गर्ल ऑफ इंडिया' म्हणून ओळखली जाणारी दिव्यांग योगसाधिका अन्वी विजय झांझरूकिया हिने योग साधनेच्या माध्यमातून दिव्यांगत्व ही मर्यादा नसून जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर मोठे यश संपादन करता येते, हे आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

१२व्या योग दिनानिमित्त सामान्य प्रशासन विभागातर्फे मंत्रालयात योग प्रात्यक्षिकांचे आयोजन केले होते. यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांच्यासह मंत्रालयातील विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अन्वी झांझरूकिया हिने आकर्षक योग प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तिने देशभरातील ५० हून अधिक योग स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत ५० पेक्षा अधिक पदके पटकावली आहेत. तसेच २०० हून अधिक योगासने करण्याचे कौशल्य तिने आत्मसात केले आहे.

दिव्यांगत्वावर यशस्वीपणे मात करत योगाच्या माध्यमातून आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य ती करत आहे.नुकत्याच चंदिगढ येथे झालेल्या अखिल भारतीय नागरी सेवा योगासन स्पर्धा २०२५-२६ मधील महाराष्ट्राच्या विजेत्यांचाही गौरव करण्यात आला. ४० ते ५० वर्षे वयोगटात शुभांगी चिकटे यांनी प्रथम क्रमांक, ४० पेक्षाकमी वयोगटात श्रीकांत घोलकर यांनी द्वितीय क्रमांक, तसेच ५० वर्षांवरील गटात दत्तात्राम सावंत आणि जगन्नाथ लांडगे यांना संयुक्तिकरित्या द्वितीय क्रमांक पटकावत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. या सर्व विजेत्यांनी मंत्रालयात योगाची प्रात्यक्षिके सादर केली.

अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सचिवालय जिमखान्याच्या योग शाखेच्या सचिव अपर्णा जाधव यावेळी उपस्थित होत्या. कार्यक्रमात योगा इन्स्टिट्यूटच्यावतीने समीर व्यास यांनी मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना खुर्ची योगाचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. योगाचे नियमित आचरण करून निरोगी आणि संतुलित जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात सरासरीच्या अवघा २० टक्के पाऊस!

## बळीराजा दमदार पावसाच्या प्रतीक्षेत

**सावंतवाडी : प्रतिनिधी**



सिंधुदुर्ग जिल्ह्यात यंदा मान्सूनचा सुरुवातीचा प्रवास अत्यंत संथ राहिला असून १ जून ते १७ जून या १७ दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत केवळ २०.८ टक्के पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षीच्या (२०२५) तुलनेत यंदा पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी असल्याने बळीराजा दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे. शासकीय आकडेवारीनुसार १ जून ते १७ जून या कालावधीत सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण १०३.९ मिमी प्रत्यक्ष पाऊस झाला आहे. या कालावधीतील जिल्ह्याचा नियमित सरासरी पाऊस ४९८.७ मिमी इतका असतो.

गेल्या वर्षी (२०२५) याच काळात जिल्ह्यात ४०६.२ मिमी (८१.५ टक्के) पाऊस झाला होता, ज्याच्या तुलनेत यंदा पावसाने मोठी ओढ दिली आहे. दोडामार्ग तालुक्यात जिल्ह्यात सर्वाधिक १२९.६ मिमी पाऊस झाला आहे. गेल्या वर्षी या काळात ३१८.४ मिमी पाऊस झाला होता. देवगड तालुक्यात ११९.२ मिमी पाऊस पडला असून टक्केवारीच्या दृष्टीने जिल्ह्यात सर्वाधिक २७.४ टक्के नोंद येथे झाली आहे. गेल्या वर्षी ४८१.४ मिमी झाली होती. सावंतवाडी तालुक्यात ११६.६ मिमी (१९.२%) पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी ४७०.४ मिमी नोंद झाली होती. वैभववाडी तालुक्यात ११२.७ मिमी (२३.०%) पाऊस झाला आहे. गेल्या वर्षी ४७१.२ मिमी नोंद झाली आहे. वेंगुर्ला तालुक्यात १११.१ मिमी (२२.०%) पाऊस पडला आहे. गेल्या वर्षी ४३७.१ मिमी नोंद झाली होती. कणकवली तालुक्यात १०९.७ मिमी (२२.८%) पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी ४१८.८ मिमी नोंद झाली आहे.

कुडाळमध्ये ९८.७ मिमी (१९.७%) पाऊस झाला. गेल्या वर्षी ३२२.५ मिमी नोंद झाली होती. मालवण तालुक्यात जिल्ह्यात सर्वात कमी ६१.५ मिमी पाऊस पडला असून ही सरासरीच्या अवघी १४.०% टक्केवारी आहे. गेल्या वर्षी ३५६.१ मिमी नोंद होती. कोकणात केवळ ४३.८ मिमी (११.७%) पाऊस झाला आहे.

# आंबोली-दोडामार्ग वनक्षेत्रात साळिंदर, भेकराची शिकार करणारी टोळी जेरबंद

**सावंतवाडी : प्रतिनिधी**

सावंतवाडी वनविभागाने आंबोली आणि दोडामार्ग वनक्षेत्रात दोन वेगवेगळ्या रात्री धडक कारवाया करत अवैध शिकार करणाऱ्या टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत वन्यजीवांची शिकार करणाऱ्या आरोपींसह मृत प्राणी, शिकारीची हत्यारे आणि एक आलिशान 'एमजी हेक्टर' कार जप्त करण्यात आली आहे.

पहिली कारवाई १७ जून रोजी रात्री घडली. आंबोली-दोडामार्ग संवर्धन राखीव क्षेत्रातील गाव मासुरे येथील शासकीय जंगलात विनापरवाना बंदुकीच्या साहाय्याने शिकार होणार असल्याची गोपनीय माहिती सहायक वनसंरक्षक सावंतवाडी यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वनविभागाच्या पथकाने रात्रीच्या अंधारात गस्त घालून सुमारे दीड किलोमीटर पाठलाग करत विठू वाघू कोकरे (४५, रा. चुरणीचीमुस चौकुळ, ता. सावंतवाडी) याला ताब्यात घेतले.

त्याच्याकडून एक ठासणीची बंदूक, छरे, दारूगोळा, विजेरी (टॉर्च) आणि शिकार केलेले साळिंदर जप्त करण्यात आले. आरोपीविरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ आणि भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ताजी असतानाच १८ जून रोजी पहाटेच्या सुमारास गाव नेने शासकीय जंगलात दुसरी कारवाई करण्यात आली. शिरगावकर पॉईंट वन्यक्षेत्रात पहाटे संशयास्पदरित्या फिरणाऱ्या तीन इसमांचा वनविभागाच्या पथकाने पाठलाग केला. त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे एक विनापरवाना बंदूक, सात जिवंत काडतुसे, दोन वापरलेली काडतुसे, दोन टॉर्च आणि तलवारी आढळून आल्या. तसेच त्यांच्याकडून बंदूक व हत्यारांच्या साहाय्याने ठार केलेले एक मृत भेकर, एक पिसोरी आणि एक कटीदंर हा वन्यजीव मुद्देमाल जप्त करण्यात आला. हे शिकारी कोल्हापूर येथून 'एमजी हेक्टर' या आलिशान कारमधून आले होते.



ही संपूर्ण कारवाई उपवनसंरक्षक (प्रा.) मिलिश शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक वनसंरक्षक वैभव बोराटे यांच्या नेतृत्वाखाली वनक्षेत्रपाल वैभव भिसे, नामदेव चोगले, मेहुब नायकवडे, सम्राट पाटील, गोरक्ष राणे, रविंद्र पाटील, संग्राम पाटील, तानाजी चव्हाण, वासुदेव खोत, अनिकेत आवारे, अनिकेत देशमुख आणि आर.आर.टी. टीमने यशस्वी केली. पश्चिम घाटातील आंबोली परिसरातील जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी वनविभाग कटिबद्ध असून, नागरिकांनी परिसरात कोणत्याही प्रकारची शिकार किंवा संशयास्पद हालचाली आढळल्यास वनविभागाशी संपर्क साधावा, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन उपवनसंरक्षक मिलिश शर्मा यांनी केले आहे.

## घरगुती कारणावरून पत्नीचा खून

**पुणे : प्रतिनिधी**

घरगुती कारणांवरून शारीरिक व मानसिक त्रास देऊन ओढणीने गळा बांधून पत्नीचा खून केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना पुणे-सातारा महामार्गावरील कात्रजपूर फाट्याजवळील आव्ही गावच्या हद्दीत गुरुवारी पहाटे घडली.

ऋतुजा अक्षय तांबे (२६) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी राजगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अक्षय रामदास तांबे (२९) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अनिकेत दादासाहेब पवार यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अनिकेत हा ऋतुजाचा मेहुणा आहे. ऋतुजा व पतीमध्ये वारंवार घरगुती कारणावरून वाद व्हायचे. राग येऊन अक्षयने पत्नीचा खून केला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. राजगड पोलीस याबाबतचा अधिक तपास करीत आहेत.

## खोपोलीमध्ये पाणीकपात; नागरिकांना काटकसरीचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाने यंदाच्या मान्सूनवर परिणाम होण्याची व पर्जन्यमान घटण्याची शक्यता व्यक्त केल्याच्या पार्श्वभूमीवर खोपोली नगरपरिषदेने पाणीपुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. उपनगराध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती विक्रम साबळे यांनी नागरिकांना उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने १३ जून रोजी दिलेल्या निर्देशानुसार ३१ ऑगस्टपर्यंत शहरी भागात पिण्याच्या पाण्याचा अखंडित पुरवठा कायम ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यातील धरणे, जलाशय आणि अन्य जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून ही खबरदारी घेतली जात असल्याचे साबळे यांनी सांगितले.

दरम्यान, खोपोली शहरात गेल्या काही महिन्यांपूर्वीपर्यंत दिवसातून दोन वेळा पाणीपुरवठा केला जात होता, मात्र पाण्याचा वाढता वापर, भविष्यातील संभाव्य टंचाई आणि उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन लक्षात घेऊन सध्या दिवसातून एकदाच पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या परिस्थितीत नागरिकांनी पालिकेला सहकार्य करावे व पाण्याचा जपून वापर करावा, अशी विनंती विक्रम साबळे यांनी केली आहे. सध्या राज्यात लांबलेल्या मान्सूनमुळे जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये अशी परिस्थिती दिसून येत आहे. शेतकऱ्यांसह सर्व नागरिकही पावसाची वाट पाहत आहेत.

## वावोशीत परवानगीशिवाय इंग्रजी शाळा सुरू? शिक्षण विभागाकडून चौकशी



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावोशी येथे खोपोली शिक्षण मंडळातर्फे सुरू करण्यात आलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेला शिक्षण खात्याची परवानगीच नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. परवानगी नसताना शाळेत प्रवेश प्रक्रिया राबवली जात असल्याने पालकवर्गात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ही शाळा पूर्वी अलिबाग येथील पीएनपी या संस्थेच्या नावाने सुरू होती. अलिबागमधील मोठे प्रस्थ असलेल्या मान्यवरांनी वडिलांच्या नावाने ही शाळा सुरू केली होती, मात्र ती चालवता न आल्याने खोपोली शिक्षण मंडळाकडे वर्ग करण्यात आल्याचे समजते. अलीकडेच पीएनपी संस्थेने ही शाळा खालापूर शिक्षण मंडळाकडे वर्ग केल्याचीही चर्चा आहे. दरम्यान, संस्थेने या शाळेत प्रवेशासंदर्भात जोरदार कार्यक्रम घेत पालकांना पाल्यांना शाळेत घालण्याचे आवाहन केले, मात्र प्रत्यक्षात शाळेची अवस्था दयनीय आहे. पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या या शाळेला संरक्षित भिंत किंवा कंपाऊंड नाही. त्यामुळे परिसरातील गायीगुरे शाळेच्या आवारात मुक्तपणे फिरताना दिसतात.

'इंग्रजी माध्यमाची शाळा की गोठा' अशी कुजबूज पालकांमध्ये सुरू आहे. परवानगी नसताना शाळा तातडीने सुरू करण्याचा संस्थाचालकांचा अट्टाहास का, याबाबत वावशी भागात उलटसुलट चर्चा सुरू आहेत. धक्कादायक म्हणजे या शाळेला वावोशी ग्रामपंचायतीचीही परवानगी नसल्याचे वृत्त आहे. याबाबत सरपंच हडप यांच्याशी संपर्क साधला असता, "संपूर्ण माहिती घेऊन सोमवारी सांगतो" असे त्यांनी स्पष्ट केले.

याप्रकरणी खालापूर पंचायत समिती शिक्षण विभागाच्या दीपा परब यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, शाळेची चौकशी करण्यासाठी अधिकारी पाठवत आहोत. चौकशी पूर्ण झाल्यावरच अधिक माहिती देता येईल.

## सिकलसेल दिन साजरा ५० रुग्णांची तपासणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्ली-मांडला येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षयकुमार सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सिकलसेल दिन साजरा करण्यात आला. यावेळी ५० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

यावेळी वैद्यकीय अधिकारी-डॉ, सौरभ घरडे, आरोग्य सेवक राजेंद्र चुनेकर, मयूर पाटील, तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा, आरोग्य सहाय्यक परीक्षित कोळी, आरोग्य सहाय्यक अमित करमळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ मनीषा शेलार, जुतिका गावंड, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी, स्थानिक नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा यांनी सिकलसेल आजाराविषयी सविस्तर माहिती सांगताना म्हणाले की, सर्वसाधारण व्यक्तीच्या शरीरात लाल रक्त पेशींचा आकार गोल व लवचिक असतात पेशींचे आयुष्य १२० दिवस असते, पण सिकलसेल आजारामध्ये या पेशींना ऑक्सिजन मिळाला नाही तर विळ्यासारखा होतो. सिकलसेल पेशींचे आयुष्य हे २० ते ३० दिवसांचे असते.



## शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट; मोफत बियाणे देण्याची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

२५ एप्रिलमध्ये भातशेतीचे धुळवाफेचे झालेले पेरे पावसाअभावी व कडक उन्हामुळे व पक्षी कीटकांमुळे फुकट गेले असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. अशा वेळी शासनाकडून या शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी मोफत भात बियाणे उपलब्ध करून देण्यात यावे, अशी शेतकरी वर्गाकडून मागणी होत आहे.

सात जूनला येणारा मान्सून रेंगाळलाआल्यामुळे रायगड सह महाड तालुक्यात भातशेतीचे धूळवाफेचे झालेले पेरे वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातच २५ मे तारखेपासून पेरलेले भात बियाणे शेतामधून पक्षी आणि कीटक यांनी खाल्ल्यामुळे तसेच सदर बियाण्यांची कडक उन्हामुळे उगवण क्षमता नष्ट झाल्याने महाड



तालुक्यातील शेतकऱ्यांना भाताची दुबार पेरणी करावी लागणार आहे.

दरम्यान, महाड तालुक्यात ९,००० हेक्टर क्षेत्र भात लागवडीखाली आहे. गेल्या एक महिन्यापासून पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे. यासाठी महाड कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना वेळोवेळी सूचनादेखील देण्यात आल्या आहेत.

# पिटसई येथील विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे मोफत वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीमधील शालेय विद्यार्थ्यांना सेवा सहयोग फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने ३०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग कीट, वह्यांचे वाटप मोठ्या प्रमाणात करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेत असताना मूलभूत सेवा मिळवून दिल्या तर विद्यार्थी निश्चित प्रगती करतील या मूळ उद्देशातून सेवा सहयोग



फाउंडेशन, मुंबईच्या वतीने स्कूल बॅग कीट, वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी या शाळेचे चेअरमन गणपत जगताप व संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग कीटचे वाटप करण्यात आले. स्कूल बॅग किटमध्ये डिक्शनरी, आलेख वही, कंपास पेटी यांचा समावेश होता. यावेळी संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे, अध्यक्ष गणपत जगताप, सचिव गोविंद ठाकर, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड, सदस्य पंदेरे गुरुजी, खेळु वाजे, रमेश पिंपळे, सर्वेश तळेकर, उदय शेलार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अकील मुलाणी, माजी मुख्याध्यापक अरुण खुळपे, विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग उपस्थित होते. शाळेचे ज्येष्ठ संचालक कृष्णा पंदेरे गुरुजी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना लाडू व चिवड्याचे वाटप करण्यात आले.

## दुखवटा

### अनुसया निकाळजे



**मुंबई :** मुंबई मराठी पत्रकार संघाच्या विश्वस्त तथा ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांच्या मातोश्री अनुसया शंकरराव निकाळजे यांचे शुक्रवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्या ९१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर गिरगाव येथील चंदनवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उरणमध्ये तालुकास्तरीय कृषी मेळावा उत्साहात





**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद अलिबाग, पंचायत समिती उरण आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने माऊली हॉल, म्हातवली येथे तालुकास्तरीय कृषी मेळावा व कृषी मार्गदर्शन कार्यक्रम गुरुवारी (दि. १८) उत्साहात पार पडला. तालुक्यात यंदा जून महिना निम्म्यापेक्षा जास्त उलटून गेला तरी पावसाची एकही सर न बरसल्याने शेतकरी पेरणीच्या संकटात सापडले आहेत. मृग नक्षत्राच्या पावसानेही अजून हजेरी न लावल्याने शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न उभे ठाकले आहेत.

गोड्या भागातील जमिनीत अजून पेरणीयोग्य पाऊस न झाल्याने पेरणीच झालेली नाही. पाऊस पडेल की नाही, या चिंतेत शेतकरी आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कृषी मेळाव्यात प्रगतशील शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शेतकऱ्यांच्या अडचणींवरही चर्चा झाली. या भागात अजून बऱ्याच ठिकाणी भाताची पेरणी झालीच नाही, तर काही भागात धूळवाफेवर पेरणी झाली आहे, मात्र पावसाचा भरवसा नसल्याने दुबार पेरणीची वेळ येण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

त्यामुळे आर्थिक संकटालाही सामोरे जावे लागेल. शेतकऱ्यांना आवश्यक बी-बियाणे उपलब्ध करून देण्याची मागणी मेळाव्यातून करण्यात आली. या मेळाव्याला जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी, दुग्ध व पशुसंवर्धन समितीचे सभापती वैकुंठ पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, जि.प. सदस्य डॉ. मनीष पाटील, रीना घरत, प्रेरणा पाटील, अविनाश पाटील, उरणचे सभापती महेश म्हात्रे, उपसभापती परेश ठाकूर, पं. स. सदस्या निर्मला घरत, प्रियांका मढवी, कविता पाटील, प्रारंभी गावंड, दीपक भोईर, कैलास भोईर, गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप बुधले, तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांच्यासह कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक अधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. यावेळी कृषी प्रदर्शनाचीही पाहणी करण्यात आली.

## घरफोडीतील तीन आरोपी जेरबंद; मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घरफोडी चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास करत तीन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून सात लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तळोजा परिसरातील दोन घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

तक्रारदाराच्या तळोजा परिसरातील गोदामाच्या मागील बाजूस असलेली कंपाऊंडची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला होता. त्यानंतर गोदामातील क्रेन मशिनमध्ये बसविण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक कंट्रोल मॉड्यूल चोरी करून नेले होते.

या प्रकरणाचा तपास सुरू असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाला गुप्त माहिती मिळाली. त्याआधारे सापळा रचून तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी चोरीची कबुली दिली. अधिक तपासात त्यांनी तळोजा परिसरातील आणखी एका घरफोडीत सहभाग असल्याचे उघड झाले. पोलिसांनी आरोपींकडून चोरीतील मुद्देमाल हस्तगत केला असून त्याची किंमत सुमारे सात लाख २५ हजार रुपये आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये साहिल पप्पू अली शहा (२१), साकीब हारून इनामदार (२७) आणि मोहम्मद हुसेन अखलाक शेख (२३) यांचा समावेश आहे.

दरम्यान, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ही धडक कारवाई केली.

## हिवताप रोखण्यासाठी पनवेल महापालिका सज्ज





### घराघरांत पोहचणार आरोग्य विभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या हिवताप दूरिकरण धोरण २०३० अंतर्गत पनवेल महानगरपालिका हद्दीत जून महिना 'हिवताप प्रतिबंध महिना' म्हणून साजरा करण्यात येत आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत ही मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनिया, झिका, चंडीपुरा व हत्तीरोग यांसारख्या कीटकजन्य आजारांविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत असून प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये लोकसहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्रे तसेच 'आपला दवाखाना' परिसरात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आशा सेविका यांच्या माध्यमातून जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवली जात आहे. पत्रके, फलक, प्रदर्शन संच, कॅलेंडर, स्टिकर्स आदी प्रचार साहित्यांच्या माध्यमातून हिवतापाची लक्षणे, उपचार व प्रतिबंधात्मक उपाय यांची माहिती दिली जात आहे. या मोहिमेदरम्यान हिवताप व इतर कीटकजन्य आजारांबाबत सविस्तर कृती आराखडा तयार करून त्यानुसार अंमलबजावणी केली जात आहे, अशी माहिती मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली.

डास नियंत्रणासाठी गप्पी माशांचा उपयोग, परिसर स्वच्छता, मच्छरदाण्यांचा वापर, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी उपाययोजनांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. यासाठी आशा स्वयंसेविकांना प्रशिक्षण देण्यात आले असून जनजागृतीसाठी विविध संस्थांचे सहकार्य घेण्यात येत आहे.

## एमएनएम विद्यालयात पितृदिनानिमित्त कलात्मक स्पर्धा



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, गव्हाण संचलित एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालयात शुक्रवारी (दि. १९) पितृदिनानिमित्त विविध कलात्मक व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वडिलांप्रति आदर, प्रेम व कृतज्ञतेची भावना वृद्धिंगत व्हावी तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इयत्ता १ ली ते २रीच्या विद्यार्थ्यांसाठी बुकमार्क निर्मिती स्पर्धा, इयत्ता ३ री ते ५वीच्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छापत्र निर्मिती स्पर्धा, इयत्ता ६ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी छायाचित्र चौकट (फोटो फ्रेम) निर्मिती स्पर्धा, इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर निर्मिती स्पर्धा तसेच इयत्ता १०वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी जाहिरात निर्मिती स्पर्धा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेचे व कलात्मकतेचे उत्कृष्ट दर्शन घडवले. विविध कलाकृतींमधून विद्यार्थ्यांनी वडिलांविषयीच्या भावना प्रभावीपणे व्यक्त केल्या. आकर्षक व नाविन्यपूर्ण कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली. हा उपक्रम प्राचार्य सायली वडवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. पर्यवेक्षक व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली तसेच कुटुंबातील वडिलांचे स्थान, त्यांचे योगदान आणि महत्त्व अधोरेखित झाले. या कार्यक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले आहे.

## पनवेलमध्ये उद्या योग दिन कार्यक्रम

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

ईपीआर फाउंडेशन, भावना ग्रुप आणि पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघातर्फे रविवारी (दि. २१) सकाळी ८ ते ११ या वेळेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, मार्केट यार्ड, पनवेल येथे 'योगा डे'चे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेविका ममता म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तीन तासांच्या या कार्यक्रमात विविध योगासने, प्राणायाम आणि इतर आरोग्यविषयक ॲक्टिव्हिटीज घेण्यात येणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अपर्णा शहा व लालचंद यादव यांनी केले आहे.

## सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थिनींची आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवात भरारी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयातील इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी जीविका माने त्याचबरोबर इयत्ता चौथीत शिकणारी सृष्टी झुंझारराव यांनी गोवा येथे आयोजित आंतरराष्ट्रीय 'भारत नृत्य' महोत्सवात उत्कृष्ट नृत्यकौशल्याच्या जोरावर दुहेरी तसेच एकेरी नृत्य स्पर्धेत विजेतेपद पटकावून शाळेचे नाव उज्ज्वल केले.

आंतरराष्ट्रीय नृत्य परिषद, पॅरिस संस्थेतर्फे आयोजित स्पर्धेत चमकदार कामगिरी करत जीविका तसेच सृष्टी यांनी यश संपादन केले. स्पर्धेसाठी विविध राज्यांतील स्पर्धक उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर नृत्य क्षेत्रातील घवघवीत यशामुळे चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या नावलौकित भर घालणाऱ्या जीविका तसेच सृष्टीचे संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी विशेष कौतुक करत त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, जेबीएसपी संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्य वर्षा ठाकूर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## नवघर ग्रामपंचायतीतील समस्यांवर सिडको अधिकाऱ्यांसमवेत ग्रामस्थांची बैठक



**उरण : बातमीदार**

बोकडविरा येथील सिडको द्रोणागिरी कार्यालयात मंगळवारी उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायत हद्दीतील नवघर, नवघरपाडा आणि कुंडेगाव येथील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांविषयी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जमलेल्या ग्रामस्थांनी गावच्या आणि परिसरातील समस्यांचा पाढाच सिडको अधिकारी संजय पाटील यांच्यासमोर वाचून दाखवला. नागरिकांनी मूलभूत सुविधांचा अभाव आणि पावसाळ्यात नव्याने उद्‌भवू शकणाऱ्या समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

यामध्ये श्री आसरा देवी तलावाच्या सुशोभीकरणाचा तसेच पावसाळ्यातील आपत्कालीन समस्यांवर सिडको अधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली. श्री आसरा देवी तलावाच्या सुशोभीकरणासाठी ६ ते सात लाखांचा निधी देण्याचे सिडकोने कबूल केले आहे. तसेच समाज मंदिर आणि व्यायामशाळा बांधण्यासाठीही निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली. याशिवाय नवघर गावातील अंतर्गत रस्त्यांचे काम, घनकचरा उचलणे व त्याची विल्हेवाट लावणे, तसेच ग्रामपंचायत हद्दीतील इतर जनहिताची कामे आणि पावसाळ्यात अचानक उद्‌भवणारी कामेही करून देण्याचे आश्वासन सिडको अधिकारी संजय पाटील यांनी ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्यांसमोर दिले. यामुळे उपस्थित ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## घरफोडीच्या सहा गुन्ह्यांची तळोजा पोलिसांकडून उकल

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घरफोडी चोरीच्या टोळीचा पर्दाफाश करत सहा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल सहा गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले असून तीन लाख ७४ हजार १५६ रुपयांचा मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली ८० हजार रुपयांची रिक्षा जप्त करण्यात आली आहे.

तळोजा फेज-२ येथील बांधकाम साईटवरील गोदामातून फिनोलेक्स कंपनीच्या वायरचे बंडल चोरीस गेल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २२५/२०२६ नोंदवण्यात आला होता. तपासादरम्यान गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी एका पुरुषासह पाच महिलांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपींनी तळोजा परिसरातील आणखी तीन, खारघरमधील दोन आणि पनवेल शहरातील एक अशा एकूण सहा घरफोडी चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. त्यानुसार तळोजा, खारघर आणि पनवेल शहर पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या सहा गुन्ह्यांची उकल झाली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये ताजुद्दीन निजामुद्दीन मन्सुरी (२९) याच्यासह मीरा कांबळे, सुनीता उपाध्ये, सुजाता उपाध्ये, कविता कांबळे आणि ज्योती सकट या महिलांचा समावेश आहे.

सर्व आरोपी मानखुर्द, मुंबई येथील रहिवासी आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामुळे घरफोडीच्या मालिकेचा छडा लावण्यात त्यांना यश आले आहे.

## डम्परची मोटरसायकलला धडक; तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसीतील आयजीपीएल चौकाजवळ भरधाव डम्परने मोटारसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने २९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाला. तळोजा पोलिसांनी डम्परचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मृत तरुणाचे नाव चूमनकुमार जगदीश महतो (२९) तर जखमीचे नाव बिकेशकुमार नवलकिशोर शर्मा (२९) आहे. दोघेही मूळचे बिहारचे असून सध्या तोंडरेगाव, पनवेल येथे राहत होते.

चूमनकुमार आणि बिकेशकुमार मोटारसायकल (एमएच-४६-डीडी-९२१२) वरून नागझरी येथील एफजी ग्लास कंपनीत ड्युटीला जात होते. आयजीपीएल चौकाजवळ पाठीमागून आलेल्या भरधाव डम्परने (एमएच-४६-सीएल-८७९७) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चूमनकुमार महतो याचा जागीच मृत्यू झाला, तर बिकेशकुमार शर्मा गंभीर जखमी झाला. जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तळोजा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## कळंबोली परिसरातील अतिक्रमणांवर पनवेल महानगरपालिकेची कारवाई





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली परिसरात शुक्रवारी (दि. १९) आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार अतिक्रमण पथकाकडून अनधिकृत झोपड्या, टपऱ्या व फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे व उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली येथील डी मार्ट परिसर, बस डेपो तसेच सेक्टर १४, १७ आणि २० मधील अतिक्रमणे हटविण्यात आली.

या परिसरातील रस्ते आणि सार्वजनिक जागांवरील अनधिकृत झोपड्या, टपऱ्या आणि अडथळे दूर करून वाहतूक आणि नागरिकांच्या सोयीसाठी मार्ग मोकळा करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, प्रभारी अधीक्षक अरविंद पाटील, कळंबोली पोलीस ठाण्याचे कर्मचारी, सुरक्षारक्षक तसेच अतिक्रमण पथकाचे कर्मचारी उपस्थित होते.

संपादकीय

## वाढते जागतिक महत्त्व

जी–७चा औपचारिक सदस्य नसतानाही भारताला विशेष निमंत्रित म्हणून दिले जाणारे स्थान हे देशाच्या वाढत्या आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक प्रभावाचे प्रतीक मानले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहभागामुळे परिषदेत विकसनशील देशांचे प्रश्न आणि बहुपक्षीय सहकार्य यांसारख्या विषयांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. परिषदेतील भारताची उपस्थिती आणि मोदी–ट्रम्प संवाद यामुळे भारताचे वाढते जागतिक महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

**फ्रान्समधील एका शहरात आयोजिण्यात आलेल्या जी–सेव्हन या विकसित देशांच्या परिषदेकडे यावेळी प्रारंभी काहिसे दुर्लक्ष झाले कारण परिषद सुरू होण्याच्या आदल्याच दिवशी अमेरिका–इराण यांच्यातील युद्धसमाप्तीविषयीच्या सामंजस्य करारावर मतैक्य झाले होते. पश्चिम आशियातील संघर्षाचे परिणाम अवघ्या जगाला भोगावे लागत आहेत. अमेरिकेसह जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, कॅनडा आणि जपान या जी–७ सदस्य देशांनाही त्याची झळ अनुभवावी लागते आहे. इंधनपुरवठ्यावर झालेल्या मोठ्या परिणामांसोबतच जागतिक अर्थकारणाला बसलेला फटका जी–७ राष्ट्रेही अनुभवत आहेत. परंतु या साऱ्याविषयी परिषदेतील व्यासपीठावर नेमकेपणाने कुणी बोलले असेल तर ते होते भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी. जी–७ परिषदेची दखल त्यामुळे घ्यायलाच हवी. भारतासारख्या बिगरसदस्य देशाने जी–७ परिषदेच्या व्यासपीठावर अशातऱ्हेने पुढाकार घेऊन जागतिक समस्यांकडे लक्ष वेधले. परिषदेतील मोदी आणि ट्रम्प यांची भेटही जगभराचे लक्ष वेधून गेली. एकीकडे ट्रम्प यांनी मोदींच्या कणखरपणाचे व मुत्सद्देगिरीचे कौतुक केले तर मोदींनी आंतरराष्ट्रीय व्यापार आणि जागतिक पुरवठा साखळी अखंड ठेवण्यासाठी सागरी वाहतुकीच्या सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित केला. पश्चिम आशियातील संघर्षादरम्यान झालेल्या भारतीय खलाशांच्या मृत्यूबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले. मालवाहतूक करणाऱ्या जहाजांच्या व सागरीमार्गांच्या सुरक्षिततेकडे मोदींनी जगभराचे लक्ष वेधले. ग्लोबल साऊथ म्हणजेच विकसनशील देशांचे या युद्धामुळे मोठे नुकसान झाले. इंधन, खते, अन्नधान्य पुरवठ्यावर परिणाम झाला. त्यामुळे जी–७ राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांना मदत केली पाहिजे असे आवाहन मोदींनी केले. एकंदर या परिषदेत भारताने आपल्या सामरिक स्वायत्ततेचे प्रगल्भ दर्शन घडवले व 'ग्लोबल साऊथ'च्या आकांक्षा आणि अपेक्षा प्रभावीपणे मांडल्या. गेले वर्षभर रशियाकडून केलेली इंधनखरेदी, आयातशुल्क, एच१बी व्हिसा फी, व्यापारकरार आदी अनेक कारणांमुळे अमेरिका–भारत यांच्या संबंधात तणाव निर्माण झाला होता. भारत आणि अमेरिका या दोघांचे सामरिक आणि आर्थिक हितसंबंध अनेक क्षेत्रांत समान आहेत. त्यामुळे मोदी–ट्रम्प यांच्या ताज्या भेटीमुळे दोन्ही देशांमधील अलीकडच्या काळातील तणावही काहिसा कमी झाल्यासारखे वाटत असून दोन्ही देशांच्या भागीदारीला आणखी बळ मिळण्याची अपेक्षा आहे. तसे दिसत असले तरी ट्रम्प यांनी केलेल्या कौतुकाने भारत कदापिही हुरळून जाणार नाही. ट्रम्प यांचा आत्मकेंद्री स्वभाव व अमेरिका प्रथम या आपल्या धोरणापायी वाट्टेल ते टोक गाठणारा लहरीपणा कुणाकडूनही दुर्लक्षित होऊ शकत नाही. आजचे जग अनेक आव्हानांनी वेढलेले आहे. रशिया–युक्रेन संघर्ष, पश्चिम आशियातील तणाव, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे, हवामान बदल, ऊर्जा सुरक्षा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या विषयांवर आंतरराष्ट्रीय सहमतीची गरज निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत फ्रान्समध्ये पार पडलेल्या जी–७ परिषदेत भारताने संतुलित आणि रचनात्मक भूमिका घेत पुन्हा एकदा जागतिक स्तरावरील आपले वाढते महत्त्व अधोरेखित केले आहे हे कुणालाही मान्य करावेच लागेल.**

# निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने भक्कम वाटचाल

महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात व्यापक परिवर्तन घडवून आणत 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाकडे भक्कम पावले टाकली आहेत. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, आधुनिक उपचार सुविधा, तंत्रज्ञानाधारित आरोग्य व्यवस्थापन, महिला व बाल आरोग्य संवर्धन, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांवरील नियंत्रण तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होत आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवांचा विस्तार, गुणवत्तापूर्ण उपचार सुविधा आणि आरोग्य जनजागृती यावर विशेष भर देण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण ते शहरी भागापर्यंत लाखो नागरिकांना आरोग्य सेवांचा लाभ मिळत आहे.

### लोकसहभागातून आरोग्य क्रांती

राज्यातील प्रत्येक गाव निरोगी, स्वच्छ आणि आरोग्यदृष्ट्या सक्षम व्हावे या उद्देशाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी, युवक मंडळे आणि ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातून गावागावात आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे.आरोग्य हा केवळ उपचारांचा विषय नसून लोकचळवळ बनावी या दृष्टीने हा उपक्रम राज्यभर प्रभावीपणे विस्तारत आहे.

### नागरी आरोग्य सेवांचे सक्षम जाळे

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत राज्यात ८१७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र,४३ नागरी सामुदायिक आरोग्य केंद्र, १९०४ आयुष्मान आरोग्य मंदिरे, ६७५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने कार्यरत आहेत. शहरी भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात या यंत्रणांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

### महिला आरोग्याला नवी दिशा

महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या अभियानांतर्गत २.३५ लाखांहून अधिक आरोग्य शिबिरे,१.१३ कोटींहून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली.उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग, रक्तक्षय यांसारख्या आजारांचे लवकर निदान करून महिलांना उपचार व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.महिलांच्या रजोनिवृत्तीनंतर उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी राज्यातील जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत.

### माता व बाल आरोग्यात आघाडी

माता व बाल आरोग्य क्षेत्रात महाराष्ट्राने देशासाठी आदर्श निर्माण केला आहे.एसआरएस–२०२३ अहवालानुसार नवजात मृत्युदर ११, अर्भक मृत्युदर १४, पाच वर्षांखालील बालमृत्युदर १६ इतका कमी झाला आहे. भारताने २०३०पर्यंत साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले मानांकन महाराष्ट्राने आधीच गाठले आहे. राज्यातील विशेष नवजात शिशुकाळजी कक्ष, पोषण पुनर्वसन केंद्रे आणि स्तनपान व्यवस्थापन केंद्रांमुळे बाल आरोग्य सेवांना मोठे बळ मिळाले आहे.

दोन कोटींहून अधिक बालकांची आरोग्य तपासणी. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत २.१३ कोटींहून अधिक बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हजारो बालकांवर हृदय शस्त्रक्रिया व इतर जीवनरक्षक उपचार करून त्यांना नवजीवन देण्यात आले.

### प्रभावी लसीकरण मोहीम

राज्यात नियमित लसीकरणाचे ९२ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे.बालकांना विविध संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण देण्यासाठी व्यापक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### आधुनिक उपचार ग्रामीण भागातही

अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा ग्रामीण व निमशहरी भागात उपलब्ध व्हाव्यात यासाठी २३ नवीन कार्डियाक कॅथलॅब,लिथोट्रिप्सी सुविधा,अत्याधुनिक निदान सेवा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये अनेक तपासण्या आणि उपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

### क्षयरोगमुक्त महाराष्ट्राकडे वाटचाल

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात व्यापक प्रमाणात निदान, उपचार आणि पोषण सहाय्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.२०२५ मध्ये शोधण्यात आलेल्या क्षयरुग्णांपैकी ८८ टक्के रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत. 'टीबी मुक्त भारत' अभियानाला महाराष्ट्रातून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे.

### संसर्गजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण

मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया, कुष्ठरोग, हत्तीरोग आणि रेबीज यांसारख्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यभर विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत.स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य कर्मचारी आणि नागरिक यांच्या सहभागामुळे या मोहिमांना प्रभावी यश मिळतेय.

### पॅलिएटिव्ह केअर आणि मानवी स्पर्श

कर्करोग आणि इतर गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये पॅलिएटिव्ह केअर सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. घरभेटी, समुपदेशन, वेदना नियंत्रण आणि दूरवैद्यकीय सेवा यांमुळे हजारो कुटुंबांना आधार मिळत आहे.

### रक्तदानात महाराष्ट्र देशात अव्वल

राज्यात २०२५मध्ये २३.६९ लाख युनिट रक्त संकलित झाले असून त्यापैकी ९९.५८ टक्के रक्तदान स्वैच्छिक स्वरूपाचे आहे.रक्तदान चळवळीत महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशात अग्रस्थान कायम राखले आहे.

सिकलसेलमुक्त महाराष्ट्रासाठी 'अरुणोदय'

सिकलसेल ॲनिमिया निर्मूलनासाठी राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'अरुणोदय' अभियान राबविण्यात येत आहे.तपासणी, समुपदेशन आणि जनजागृतीच्या माध्यमातून या आनुवंशिक आजाराविरुद्ध व्यापक लढा उभारण्यात आला आहे.

### निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न साकारतेय

आधुनिक आरोग्य सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, प्रशिक्षित मनुष्यबळ, महिला व बाल आरोग्यावरील विशेष भर, संसर्गजन्य रोग नियंत्रण आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधत महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करीत आहे. ग्रामीण ते शहरी भागापर्यंत प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देत राज्य शासन 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करीत आहे. लोकसहभाग, आधुनिक आरोग्य सेवा व सुजाण नागरिक यांच्या बळावर निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न आता वास्तवात उतरू लागले आहे.

**–दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय–मुंबई

## लक्ष्मणराव किर्लोस्कर

किर्लोस्कर इंडस्ट्रीजचे संस्थापक लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा जन्म २० जून १८६९ रोजी बेळगाव जिल्ह्यातील गुरलाहोसूर या छोट्याशा गावात झाला. त्यांनी आपल्या आयुष्याची सुरुवात शाळेत शिक्षक म्हणून केली आणि नंतर बेळगावमध्ये सायकल दुरुस्तीचे दुकान उघडले.

जेव्हा बेळगाव नगरपालिकेने किर्लोस्करांना त्यांची जागा रिकामी करण्याचे आदेश दिले तेव्हा लक्ष्मणरावांना त्यांच्या कार्यशाळेसाठी योग्य जागा मिळाली नाही. परंतु औंधच्या शासकाने त्यांना दहा हजार रुपयांचे कर्ज देऊन जागा देऊ केल्यामुळे त्यांनी कुंडल रोड नावाच्या रेल्वेस्थानकाच्या बाजूला पडीक जमिनीत आपला कारखाना सुरू केला. हा कारखाना नंतर प्रसिद्ध किर्लोस्कर उद्योगात विकसित झाला आणि स्टेशनला किर्लोस्करवाडी असे नाव पडले.



लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी ३२ एकर ओसाड जमिनीवर पाऊल ठेवले, जिथे कॅक्टस पसरलेले होते आणि नागांनी भरलेले होते. मानवी क्षमतेवरील त्यांच्या श्रद्धेने प्रेरित होऊन लक्ष्मणरावांनी २५ कामगार आणि त्यांच्या कुटुंबांना एकत्र केले आणि त्या ओसाड जागेचे त्यांच्या स्वप्नातील गावात रूपांतर करण्यात यश मिळवले. लक्ष्मणरावांचा मानवावरील विश्वास इतका होता की, तुकाराम रामोशी आणि पिर्या मांग, दोघेही दोषी दरोडेखोर, किर्लोस्करवाडीचे विश्वासू रक्षक बनले.

लक्ष्मणरावांना त्यांचा पहिला लोखंडी नांगर विकण्यासाठी दोन वर्षे लागली. त्यांचे स्वप्न होते की त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतःचा उद्योग आणि समुदाय बांधावा; त्यांनी हे स्वप्न किर्लोस्करवाडी येथे साकार केले, जिथे त्यांनी १९१०मध्ये किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड कारखाना सुरू केला. पारंपरिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना यंत्रांचा वापर करण्यास सांगणे अवघड काम होते. त्यांनी उत्पादन वाढवणाऱ्या यांत्रिक, आधुनिक शेतीचा प्रसार केला. अशा या महान उद्योगमहर्षीचे २४ एप्रिल १९९४ रोजी निधन झाले. (साभार इंटरनेट)




## घरावर सोलार प्लांट बसवण्याबद्दलचे गैरसमज

ढगाळ हवामानात सोलर पॅनल काम करत नाहीत, त्यांची सतत देखभाल करावी लागते किंवा ते फक्त उष्ण भागातच प्रभावी ठरतात, असे अनेक गैरसमज प्रचलित आहेत, मात्र यामागचे वास्तव वेगळे आहे. अनेकांना वाटते की सूर्यप्रकाश नसल्यास सोलर पॅनल पूर्णपणे बंद पडतात. प्रत्यक्षात असे नाही. सोलर पॅनल्सना वीज निर्मितीसाठी प्रकाशाची आवश्यकता असते, केवळ तीव्र उन्हाची नाही. ढगांमधून येणारे फोटॉन्स (प्रकाशकण) सोलर पॅनल्स शोषून घेतात आणि त्याद्वारे वीज तयार करतात.



सोलर पॅनल्समध्ये कोणतेही हलणारे भाग नसतात. त्यामुळे त्यामध्ये बिघाड होण्याची शक्यता तुलनेने कमी असते. तज्ज्ञांच्या मते, वर्षातून एक–दोन वेळा तांत्रिक तपासणी करणे पुरेसे असते. धुळीचे प्रमाण जास्त असलेल्या भागात महिन्यातून एकदा स्वच्छता करणे फायदेशीर ठरते.

राजस्थान, हरियाणा, पंजाब किंवा उत्तर प्रदेशसारख्या अधिक सूर्यप्रकाश असलेल्या राज्यांमध्ये सोलर पॅनल्सची कार्यक्षमता अधिक असू शकते. मात्र याचा अर्थ असा नाही की इतर राज्यांमध्ये ते प्रभावी ठरत नाहीत. सोलर पॅनल्स भारतातील जवळपास सर्वच भागांत कार्यक्षमतेने काम करतात. सूर्यप्रकाश उपलब्ध असलेल्या दिवसांच्या प्रमाणानुसार उत्पादनात फरक पडू शकतो, पण कोणत्याही प्रदेशात ते पूर्णपणे निष्प्रभ ठरत नाहीत.

उच्च तापमानामुळे सोलर पॅनल्सची कार्यक्षमता काही प्रमाणात कमी होऊ शकते, पण ते काम करणे थांबवत नाहीत. तज्ज्ञांच्या मते अतिउष्णतेमुळे ऊर्जा निर्मितीवर थोडा परिणाम होऊ शकतो, मात्र आधुनिक तंत्रज्ञानामुळे आता अशा पॅनल्सची निर्मिती होत आहे, ज्यांच्यावर तापमानाचा परिणाम अत्यल्प होतो. त्यामुळे उन्हाळ्यातही सोलर पॅनल्स नियमितपणे वीज निर्मिती करत राहतात. पडू शकतो, पण कोणत्याही प्रदेशात ते पूर्णपणे निष्प्रभ ठरत नाहीत. उच्च तापमानामुळे सोलर पॅनल्सची कार्यक्षमता काही प्रमाणात कमी होऊ शकते, पण ते काम करणे थांबवत नाहीत. तज्ज्ञांच्या मते अतिउष्णतेमुळे ऊर्जा निर्मितीवर थोडा परिणाम होऊ शकतो, मात्र आधुनिक तंत्रज्ञानामुळे आता अशा पॅनल्सची निर्मिती होत आहे, ज्यांच्यावर तापमानाचा परिणाम अत्यल्प होतो. त्यामुळे उन्हाळ्यातही सोलर पॅनल्स नियमितपणे वीज निर्मिती करत राहतात.

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (एमएसईबी)

एमएसईबी अर्थात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे राज्यात कार्यरत असलेले सरकारचे विद्युत नियमन मंडळ आहे. एमएसईबीची स्थापना २० जून १९६० रोजी विद्युत (पुरवठा) अधिनियम १९४८च्या कलम अंतर्गत करण्यात आली. १९९८मध्ये ही राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळानंतर भारतातील दुसरी सर्वात मोठी वीज निर्मिती युटिलिटी होती.

कंपनीचे पूर्ववर्ती बॉम्बे इलेक्ट्रिसिटी बोर्ड होते जे ६ नोव्हेंबर १९५४ रोजी स्थापन झाले आणि ३१ मार्च १९५७पर्यंत कार्यरत होते. जेव्हा त्याचे नाव बदलून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ असे करण्यात आले, जे १९ जून १९६०पर्यंत कार्यरत होते. एमएसईबी आणि एनरॉन यांच्यातील सहकार्याचा परिणाम होता.

भारत सरकारच्या विद्युत कायदा २००३नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची २००५मध्ये चार कंपन्यांमध्ये पुनर्रचना करण्यात आली.

महावितरण महानिर्मिती पॉवर प्लांट किंवा इतर राज्य वीज मंडळे आणि खाजगी क्षेत्रातील वीज निर्मिती कंपन्यांकडून वीज खरेदी करून राज्यभर वीज वितरणासाठी जबाबदार आहे. एमएसईबी होल्डिंग कंपनी लिमिटेड या होल्डिंग कंपनीची इतर तीन कंपन्यांमधील सर्व हिस्सेदारी आहे. या तीनही कंपन्यांमध्ये अभियंत्यांचे वर्चस्व आहे.




निमित्त

भारतातील एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमतेपैकी १३ टक्के महाराष्ट्राचा वाटा आहे, जी मुख्यत्वे कोळसा आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांचा वापर करून अपारंपरिक संसाधनांपासून तयार केली जाते. वीज उत्पादनासाठी मंडळाची सात जलविद्युत व १० औष्णिक (यांत एक गॅस टरबाइन आहे) केंद्र आहेत व त्यांनी १९८१–८२मध्ये एकूण उत्पादनापैकी ८२ एमएसईबी टक्के उत्पादन केले होते.

याशिवाय लागणारी वीज, मंडळाने टाटांकडून १० टक्के, अणुशक्ती केंद्राकडून पाच टक्के व कर्नाटक, मध्य प्रदेश, गुजरात या राज्यांच्या वीज मंडळाकडून प्रत्येकी एक टक्के अशी विकत घेतली. मंडळाचे सर्वांत मोठे जलविद्युत केंद्र कोयना धरणावर असून त्याची स्थापित क्षमता (तिन्ही टप्पे) आठ लक्ष कि.व्हॅ. आहे. सर्वांत मोठे औष्णिक केंद्र कोराडी (तिन्ही टप्पे) येथे आहे.


मंडळाने १९८१–८२मध्ये पुरविलेल्या विजेपैकी ५६ टक्के उद्योगधंद्यांना, १३ टक्के घरगुती वापरासाठी, शेतीला १२ टक्के आणि उरलेली १९ टक्के व्यापार, सार्वजनिक प्रकाश, इतर किरकोळ बाबी यांसाठी वापरली होती.

मंडळाचे व्यवस्थापन शासननियुक्त अध्यक्ष व सात सदस्यांचे संचालक मंडळ यांच्याकडे आहे, तसेच मंडळाची १५ सदस्यांची सल्लागार समिती असून त्यात वीजपुरवठा उद्योग, वीज उपभोक्ते, व्यापार व उद्योग, वाहतूक, कामगारवर्ग व लोकहितार्थ शासननियुक्त सदस्य आहेत.

मंडळाला वित्तपुरवठा बहुतांशाने शासनाकडून कर्जरुपाने होतो, तसेच मंडळ कर्जरोख्यांद्वारे व इतर पद्धतींच्या कर्जाद्वारे भांडवल गोळा करू वा उभारू शकते. कालानुरूप वीजपुरवठ्याची मागणी वाढत असून त्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत.

(साभार विकीपीडिया)


## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## रोज सकाळी चहा पिण्यापूर्वी करा 'ही' एक गोष्ट

सकाळची वेळ आणि हातात गरमागरम चहाचा कप...आपल्यापैकी बहुतेकांची सकाळ या सुखद अनुभवाशिवाय पूर्णच होत नाही. अंथरुणातून उठल्या उठल्या 'बेड टी' पिणे हा अनेकांच्या लाईफस्टाईलचा भाग बनला आहे. चहा प्यायल्याशिवाय अनेकांची सुस्तीच जात नाही. पण, तुमची हीच आवडती सवय तुमच्या आरोग्यासाठी 'सायलेंट किलर' ठरतेय, हे तुम्हाला माहित आहे का? सकाळी उठल्या – उठल्या चहा पिणं कितीही आवडत असलं तरी ही वाईट सवय आरोग्यासाठी हानिकारक आहे.



सकाळी रिकाम्या पोटी चहा प्यायल्याने छातीत जळजळ होणे, आंबट ढेकर येणे, पोट फुगणे आणि गॅस–ॲसिडिटीचा भयंकर त्रास सुरू होतो. जर तुम्हालाही चहामुळे हा त्रास होत असेल, तर आता चहा सोडण्याची अजिबात गरज नाही! चहा पिण्यापूर्वी फक्त १ सोपी गोष्ट करून तुम्ही या त्रासापासून कायमची सुटका मिळवू शकता. नॅशनल हेल्थ मिशनने नुकताच यावर एक अत्यंत महत्त्वाचा सल्ला दिला आहे, तो नेमका काय आहे? ते पाहूयात...

नॅशनल हेल्थ मिशनच्या आरोग्य तज्ज्ञांच्या मते, जेव्हा आपण रात्रभर ७ ते ८ तास झोपतो, तेव्हा आपले शरीर पूर्णपणे उपाशी असते आणि शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झालेले असते. अशा वेळी सकाळी उठल्या उठल्या थेट चहा शरीरात गेल्यास पोटातील ॲसिडची पातळी झपाट्याने वाढते. यामुळेच ॲसिडिटी, गॅस, पोटात तीव्र जळजळ आणि अपचनाच्या समस्या उद्भवतात. इतकेच नाही, तर रिकाम्या पोटी चहा घेतल्याने चहामधून मिळणारी ऊर्जा काही वेळातच संपते आणि नंतर शरीरात प्रचंड थकवा किंवा सुस्ती जाणवू लागते.

सकाळी रिकाम्या पोटी चहा प्यायल्यानंतर ॲसिडिटी, गॅस, पोटात तीव्र जळजळ आणि अपचनाच्या समस्या होऊ नयेत म्हणून चहा पिण्यापूर्वी एक सोपा उपाय करावा. पोटाचे रक्षण करण्यासाठी आणि पचनसंस्था निरोगी ठेवण्यासाठी 'नॅशनल हेल्थ मिशन'च्या तज्ज्ञांनी सांगितल्यानुसार सकाळी उठल्यानंतर चहाचा कप हातात घेण्यापूर्वी किमान एक ग्लास साधे किंवा कोमट पाणी पिण्याची सवय लावा.

विशेषतः सकाळी रिकाम्या पोटी चहा घेण्याऐवजी काही भिजवलेले बदाम, खजूर, केळे किंवा हलका नाश्ता खाल्ल्यानंतर चहा पिणे अधिक फायदेशीर ठरू शकते. यामुळे पोटाला अन्नाचा आधार मिळतो आणि आम्लपित्ताचा धोका कमी होतो.

# मृग सरले अन् पाऊस हरवला!

## रायगडात ३८ अंशांचा तडाखा



**अलिबाग : प्रतिनिधी**

मृग नक्षत्र संपत आले, जून महिना निम्म्याहून अधिक उलटला तरी पावसाने पाठ फिरवल्याने रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. जिल्ह्यात तापमानाचा पारा ३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला असून, उष्णतेच्या झळा आणि पावसाअभावी शेतीसह जनजीवन विस्कळीत झाले आहे.

दक्षिण रायगडात मे महिन्याच्या अखेरीस धूळवाफ्यांवर भाताची पेरणी केली जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांनी पावसाची आस धरत पेरण्या केल्या, परंतु पावसाने पाठ फिरवली. महाड तालुक्यातील वरंध व बारसगाव परिसरात परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. धूळवाफ्यावर केलेली भाताची पेरणी पावसाअभावी धोक्यात आली असून शेतकरी आता पंपाद्वारे पाणी देत भातरोपे जिवंत ठेवण्यासाठी धडपड करत आहेत.

रोपे करपू नयेत म्हणून शेतकरी दिवस-रात्र प्रयत्न करत असले तरी तीव्र उष्णतेमुळे रोपांची वाढ खुंटल्याचे चित्र आहे. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे उन्हाळा लांबल्याचा फटका थेट शेतीला बसत आहे. पावसाअभावी खरिपाच्या पेरण्या रखडल्या असून, ज्या शेतकऱ्यांनी धूळपेरणी केली होती त्यांच्यासमोर आता बियाणे वाया जाण्याचे आणि दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. वाढत्या उकाड्यामुळे विहिरी व कूपनलिकांची पाणीपातळी घटत असून, पिकांना पाणी देणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

दरम्यान, हवामानाचा विचित्र खेळ सुरूच आहे. सकाळी ढगाळ वातावरण, दुपारी कडक ऊन आणि रात्री गारवा अशा बदलत्या हवामानामुळे नागरिकही त्रस्त झाले आहेत. उष्णतेमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनू लागला असून ग्रामीण भागात चिंता वाढली आहे. शेतीबरोबरच गुरांच्या चाऱ्याचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.निसर्ग साथ देत नसल्याने शेतकरी हतबल झाला असून, शासनाने दुबार पेरणीसाठी आर्थिक मदत तसेच जनावरांच्या चाऱ्याची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. ढगाळ वातावरणामुळे येत्या दोन-तीन दिवसांत पावसाची शक्यता वर्तवली जात असली तरी प्रत्यक्ष पाऊस पडल्याशिवाय हा उकाडा कमी होणार नसल्याचे चित्र आहे.

## एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ठाकरे गटातील खासदार आमच्यासोबत -ना. गोगावले



**माणगाव : बातमीदार**

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षातील सहा खासदार आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेत आहेत. त्यांच्या या निर्णयामागे एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व, कार्यपद्धती आणि सर्वसामान्यांप्रति असलेली बांधिलकी हेच प्रमुख कारण आहे. त्यामुळे या घडामोडींचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच जाते, असे प्रतिपादन राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी केले.

माणगाव उपजिल्हा रुग्णालय येथे शिवसेना वर्धापन दिनानिमित्त आयोजित रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्यात शुक्रवारी (दि.१९) ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र कोअर कमिटी सदस्य विकास गोगावले, माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख महेंद्र मानकर, डॉ. परेश उभारे, नितीन दसवते, डॉ. संतोष कामेरकर, जिल्हा परिषद सदस्य दिनेश हरवंडकर, राजाभाऊ रणपिसे तसेच शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री गोगावले यांनी राज्यातील पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील आणि आवश्यक ती मदत उपलब्ध करून देईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी यावेळी दिली.

## भाताण बोगद्यात दरड काढण्यासाठी ब्लॉक

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील वाहतूक गुरुवारी पाच टनाचा महाकाय दगड व माती काढण्यासाठी दुपारी दोन तास रोखून धरण्यात आली होती. दुपारी दोननंतर ही वाहतूक पूर्ववत करण्यात आली होती.

शुक्रवारी दुपारी १२ वा. सुमारास द्रुतगती महामार्गावरील भातान बोगदा परिसरात पावसाळ्यापूर्वी लूज बॉर्डर निखळलेले दगड पाडून घेण्याचे काम सुरू होते. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून वाहतूक थांबवण्यात आली होती. थोड्या थोड्या वेळाच्या ब्रेकनंतर वाहतूक सुरू ठेवली होती.



## रेवदंडा बायपासवर अनधिकृत डम्पिंग ग्राउंड; स्वच्छतेची मागणी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बायपास रस्त्यावर अनधिकृत डम्पिंग ग्राउंड निर्माण झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून प्रवासी व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, पावसाळा तोंडावर आला असताना संबंधित प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून हा कचरा हटवावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

रेवदंडा बायपास परिसरात काही नागरिकांकडून केरकचरा तसेच इतर घनकचरा टाकण्यात येत असल्याने तेथे अनधिकृत डम्पिंग ग्राउंड तयार झाले आहे. कचऱ्याचा ढीग दिवसेंदिवस वाढत असून संपूर्ण परिसर दुर्गंधीयुक्त बनला आहे. यामुळे येथून जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, या कचऱ्यामुळे भटक्या कुत्र्यांचे टोळके परिसरात कायम वावरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचादेखील प्रश्न निर्माण झाला आहे. बायपास मार्गावरून मुरूड, रोहा तसेच अलिबाग तालुक्याकडे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. पर्यटकांची वाहनेही या मार्गाचा वापर करतात.

## चौक-कर्जत मार्गावर अपघातात तरुणाचा मृत्यू





**चौक, खालापूर, नेरळ** : चौक-कर्जत रस्त्यावर भिलवले हद्दीत भीषण अपघात झाला असून जितेश रुठे (२४, राहणार बीड जांबरुंग, तालुका कर्जत) याचा जागीच मृत्यू झाला आहे. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास भिलवले फाटाजवळ चौक दिशेकडून कर्जतकडे जाणारा डंपर गाडी क्रमांक MH४३/BG/ ९०९० याने कर्जतकडून चौककडे येणाऱ्या मोटरसायकल क्रमांक MH ४६/CZ/१३१३ याला जोरदार धडक दिली. ही धडक एवढी भयानक होती की मोटारसायकलचालक जितेश रुठे याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना समजताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, चौक प्रभारी विशाल पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र जितेशचा मृत्यू झाला होता. जितेशचे पार्थिव रुग्णवाहिकेमधून चौक ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चौक प्रभारी विशाल पवार करीत आहेत. चौक-कर्जत रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे.


### नमुना-१

### उपविभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल यांजकडून

**जाहीर नोटीस**

क्र. उविअ/भुसं/कात-५/कळंबोली/एस.आर. ०१/२०२६
उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय
पत्ता :- जुना ठाणानाका रोड, पनवेल ता. पनवेल,
जि. रायगड, दिनांकः १२/०६/२०२६

ज्याअर्थी कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र./एम.एस.आय.डी.सी./ कळंबोली जंक्शन/भूसंपादन/१३२६/२०२६, दिनांक १७/०४/२०२६ अन्वये यांनी मौजे कळंबोली येथील जमिनींचे रस्ते व उड्डाणपुल विकास कामाकरीता खाजगी क्षेत्रातील खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेकामी महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२/५/२०१५, दिनांक ३०/९/२०१५ व शासन परिपत्रक क्रमांक एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांचे नावे घेणेकामी प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केला आहे.

.. आणि ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. भूसंपादन/टे-६/E-८८२६६५४/मौजे-कळंबोली/२०२६, दिनांक २७/०४/२०२६ व कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १७/०४/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच महसूल व वनविभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल याद्वारे,
(एक) अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे आणि
(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेडयुल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी मोबदला निश्चित करण्यात येईल.
(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचे नांवे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबत संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.
२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी), पनवेल उपविभाग पनवेल यांचेकडे दाखल करावीत.
३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल / कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.
४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करणेत आलेल्या क्षेत्राच्या आलेल्या आराखड्याची प्रत उप विभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल व कार्यकारी अभियंता (कोकण विभाग) महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची-एक**

**थेट खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशिल**

**गाव - कळंबोली, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड**

| अ.नं. | खातेदाराचे नांव | स.नं./हि.नं. | भुसंपादन क्रमांकानुसार संपादीत करावयाचे अंदाजे क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | श्री. नरशी गोविंद रावरिया, सवजी भानजी गामी | १/१२+१३+१४+१६ | ०.००.६० |
| २ | श्री. जसमीत कौर हरेंद्रसिंग लांबा, हरेंद्रसिंग प्रितमसिंग लांबा, इकबाल हुसेन मोहम्मद हनिफ खान | १२०/१ | ०.१४.५० |
| | | | **०.१५.१०** |

ठिकाण : पनवेल,
दिनांक : १२/०६/२०२६

सही/-
(पवन चांडक)
उप विभागीय अधिकारी पनवेल
उप विभाग पनवेल

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/४६/७५१/२०२६


## एल-निनोच्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे!

### पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांचे आवाहन



**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या 'एल निनो'च्या संभाव्य संकटामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी केले आहे.पशुपालकांना या संकटाचा सामना समर्थपणे करता यावा यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुपालक व शेतकरी यांना पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गाई व म्हशींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात घट होऊ नये म्हणून पशुपालकांनी पोषक असणाऱ्या चारा पिकांची लागवड करावी. अशी पिके निवडावीत ज्यातून मुख्य शेतमाल (धान्य/उत्पादन) तर मिळेलच, सोबतीला जनावरांच्या पोषणासाठी दर्जेदार चाराही उपलब्ध होईल.

शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर अथवा पडीक जमिनीवर येणारे नैसर्गिक गवत वाया न घालवता त्याचे योग्य जतन करावे. पावसाची ओढ किंवा टंचाईच्या संकट काळात हेच गवत जनावरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आधार ठरणार आहे. भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या उपलब्ध जमिनीवर त्यांनी मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादनावर भर द्यावा. उत्पादित केलेला अतिरिक्त चारा 'मुरघास' किंवा सुक्या चाऱ्याच्या स्वरूपात साठवून ठेवावा, जेणेकरून जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

पशुपालक-शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करण्यासाठी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. संकटकाळात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सक्षम असून, कोणत्याही शंका तसेच अडचणी संदर्भात पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर नंबरवरुन माहिती व पशुवैद्यकीय सेवा प्राप्त करून घ्याव्यात, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

## रोहा पंचायत समितीतर्फे राजिप प्राथमिक शाळा सोनगावचा सन्मान



**रोहे : प्रतिनिधी**

विनोबा ॲपद्वारे घेण्यात आलेल्या इ. ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये रोहा तालुक्यातून गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनगावचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल १८ जून रोजी द.ग.तटकरे सभागृह पंचायत समिती रोहा येथे सन्मान करण्यात आला.

हा सन्मान शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक संतोष धोत्रे व आदर्श शिक्षक ब्रिजेश भादेकर यांनी स्वीकारला.

यावेळी पंचायत समिती सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, जगन्नाथ धनावडे, समृद्धी कोळी, अरुणा हंबीर, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे आणि विनोबा भावे ॲपचे मयूर टेंबे आदी उपस्थित होते.


### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**जाहिर सुचना**
**पनवेल महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण विभाग**

पनवेल महानगरपालिकेतर्फे दिनांक २३ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय विधवा दिन निमित्त "एकल महिला दिवस" साजरा करण्यात येणार आहे. त्या कार्यक्रमाअंतर्गत प्रस्तावित राज्य एकल महिला धोरणात समाविष्ट करण्यात यावयाच्या बाबींविषयी महिलांची मते, सूचना व अपेक्षा जाणून घेण्यात येणार आहेत.

सदर कार्यक्रम ज्येष्ठ नागरिक हॉल, पनवेल येथे सायंकाळी ४.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये एकल महिलांच्या समस्या, अडचणी व गरजा जाणून घेण्यात येणार असून विविध शासकीय योजना, सवलती व उपलब्ध सुविधांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच संबंधित विभागांच्या माध्यमातून आवश्यक मार्गदर्शन करण्यात येईल.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व एकल महिलांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. कार्यक्रमास प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या नमुना अर्ज/फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरून तो महिला व बालकल्याण विभागाकडे अथवा samup.pmc@gmail.com या ई-मेल आयडीवर दि. २९/०६/२०२६ पर्यंत पाठवावा.

सही/-
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/जनसंपर्क./३१२६/
प्र.क्र.१७०/१८२/२०२६

# नवी मुंबई मनपाचा पर्यावरण अजेंडा

## पर्जन्य, पुनर्वापरित पाण्यासह सौरऊर्जेला प्राधान्य

**नवी मुंबई : बातमीदार**

वाढत्या हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने पर्जन्यजल संधारण, पुनर्वापरित पाण्याचा वापर आणि सौरऊर्जेला शहरभर चालना देण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यावरणप्रेमी गटांच्या शिफारशी स्वीकारत मनपा आयुक्त कैलास शिंदे यांनी गृहनिर्माण संस्थांना बागकाम आणि वाहने धुण्यासाठी पुनर्वापरित पाणी पुरवण्याची घोषणा केली. नवी मुंबई महानगरपालिकेने शहरभर पर्जन्यजल संधारणाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे.



तत्काळ उपाययोजना म्हणून बांधकाम, बागकाम आणि इतर अपेय वापरांसाठी पुनर्वापरित पाण्याचा पुरवठा वाढविण्यात येणार आहे. शुक्रवारी (दि. १९) सायंकाळी नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' उपक्रमाच्या शिष्टमंडळाशी झालेल्या बैठकीत आयुक्त कैलास शिंदे यांनी ही माहिती दिली. "बागकाम आणि वाहने धुण्यासाठी गृहनिर्माण संस्थांनाही पुनर्वापरित पाणी पुरवण्यात येईल," असे शिंदे यांनी सांगितले. बांधकाम क्षेत्रासाठी पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याच्या चर्चांमध्ये तथ्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

"मौल्यवान पिण्याच्या पाण्याने वाहने धुणे हा गुन्हाच आहे," असे सांगत त्यांनी नागरिक आणि गृहनिर्माण संस्थांना शक्य तेथे पुनर्वापरित पाण्याचा वापर करण्याचे आवाहन केले.मनपा दीर्घकालीन जलसंवर्धन उपाययोजनांसाठी कटिबद्ध असून उद्यान विभागाला पाणी बचतीच्या उपक्रमांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार आणि पाम बीच ग्रीन्स फोरमचे समन्वयक श्रीकांत पाटकी यांच्या शिष्टमंडळाने जागतिक पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या गोलमेज परिषदेतील प्रमुख शिफारशी आयुक्तांसमोर सादर केल्या.

शहरात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा मोठा हिस्सा समुद्रात वाहून जात असल्याने ते संकलित करून पुनर्वापरासाठी शहरव्यापी पर्जन्यजल संधारण मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली. मनपाने मुख्यालय, विभागीय कार्यालये, अग्निशमन केंद्रे, बस डेपो आणि इतर नागरी सुविधांमध्ये पर्जन्यजल संधारण यंत्रणा उभाराव्यात, अशी सूचनाही करण्यात आली. निवासी, व्यावसायिक आणि संस्थात्मक प्रकल्पांमध्ये पुनर्भरण विहिरी व भूजल पुनर्भरण उपाययोजना अनिवार्य करण्याची शिफारस 'कॅन'ने केली. मोरबे धरण व संबंधित जलाशयांचे गाळ काढून साठवण क्षमता वाढविणे, प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा अधिक वापर करणे, पाणथळ जागा आणि नैसर्गिक नाले यांचे संरक्षण व पुनरुज्जीवन करणे तसेच पुनर्विकास व पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये झिरपणक्षम पृष्ठभाग, जैव-नाले आणि शहरी वने यांसारख्या जलसंवेदनशील नगररचना तत्त्वांचा समावेश करावा, अशा शिफारशीही करण्यात आल्या.

प्रत्येक नागरिकाला घरातून किमान तीन झाडे दिसावीत, परिसरात ३० टक्के वृक्षाच्छादन असावे आणि ३०० मीटरच्या अंतरात दर्जेदार हिरवळ उपलब्ध असावी, या जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त ३-३०-३०० तत्त्वांचा अवलंब करण्याची शिफारसही मंचाने केली. शिंदे यांनी नवी मुंबईत सौरऊर्जेचा वापर वाढविण्याच्या प्रस्तावाचेही स्वागत केले. जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सौरऊर्जा अत्यावश्यक असल्याचे नमूद करत त्यांनी विभागीय कार्यालये, शाळा, रुग्णालये, बाजारपेठा आणि क्रीडा संकुलांसह सर्व मनपा इमारतींवर सौर पॅनेल बसविण्याच्या सूचनांचे कौतुक केले.वाहनतळ, बस थांबे, बस डेपो आणि अग्निशमन केंद्रांवर सावलीसह स्वच्छ ऊर्जा निर्मिती करणाऱ्या सौर पॅनेल छतांची उभारणी, सौरऊर्जेवर चालणारी पथदिवा व्यवस्था, पुनर्विकास प्रकल्प आणि मोठ्या गृहनिर्माण संस्थांसाठी छतावरील सौरऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन, रुग्णालये व आपत्कालीन सेवा केंद्रांसाठी बॅटरी साठवण व्यवस्था तसेच सामुदायिक सौरऊर्जा आणि नेट मीटरिंग मॉडेल्सचा अभ्यास करण्याची शिफारस करण्यात आली.

मनपाच्या विविध सुविधांमध्ये सौरऊर्जा क्षमतेसाठी वेळबद्ध आराखडा जाहीर करावा आणि सौर प्रकल्प, ऊर्जा निर्मिती तसेच कार्बन उत्सर्जनातील घट यांचा मागोवा घेण्यासाठी सार्वजनिक डॅशबोर्ड तयार करावा, असेही 'कॅन'ने सुचविले. "पुनर्विकास आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारासह नवी मुंबई वेगाने विकसित होत असताना हवामान-लवचिक शहरी विकासाचे राष्ट्रीय मॉडेल बनण्याची मोठी संधी शहरासमोर आहे," असे बी. एन. कुमार यांनी सांगितले. नॅटकनेक्ट फाउंडेशनने शाश्वत जलव्यवस्थापन आणि स्वच्छ ऊर्जा उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी मनपाला पूर्ण सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

# महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात!

## वनमंत्री गणेश नाईक यांचे प्रतिपादन

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील शिक्षण संकुलाच्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात वनमंत्री गणेश नाईक यांनी महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची गरज व्यक्त केली. राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा दाखला देत त्यांनी हे प्रतिपादन केले. 'सुरंगी' या नावाने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित स्मरणिकेचा संदर्भ देऊन नाईक यांनी सुरंगी वृक्षाची विविध वैशिष्ट्ये उपस्थितांना अवगत करून दिली.



समृद्धी महामार्गासह इतर महामार्गांच्या दुतर्फा वृक्ष लागवडीचे कार्य वन विभागाकडून जोमाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरणासाठी कार्य करू इच्छिणाऱ्या व्यक्ती व संस्थांनी 'ग्रीन बॉण्ड्स' विकत घ्यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी नाईक यांनी विद्याभवनच्या परसबागेची स्तुती केली व आंबा उत्पादनाचे फायदे स्पष्ट केले.शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी विद्याभवन शाळेला मिळालेले 'ए प्लस' मानांकन व 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात ठाणे जिल्ह्यातून मिळालेल्या पहिल्या क्रमांकाबद्दल शाळेचे व सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. शाळा माजी विद्यार्थीच चालवतात ही विशेष उल्लेखनीय बाब असल्याचे त्यांनी नमूद केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमात राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील विजेते आणि दहावी-बारावी परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. 'सुरंगी' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

इको क्लबमार्फत सर्व मान्यवरांच्या हस्ते २५ सुरंगी वृक्षांचे वृक्षारोपणही करण्यात आले. याप्रसंगी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, नगरसेवक सुरज पाटील, गिरीश म्हात्रे, नेत्रा शिर्के, रुपाली भगत, प्रीती भोपी, पुणे विद्यार्थी गृहाचे माजी कार्याध्यक्ष प्राचार्य कृ.ना. शिरकांडे, उपाध्यक्ष प्राचार्य श्रीधर पाटणकर, कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव दिनेश मिसाळ, संचालक राजेंद्र कडूसकर, डॉ. राजेंद्र कांबळे, देणगीदार सिंधु धामणकर, डॉ. उपेंद्र किंजवडेकर, अण्णासाहेब टेकाळे, डॉ. बा. गो. कुलकर्णी, विधान भवनचे मुख्य ग्रंथपाल बा. बा. वाघमारे तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, नवी मुंबईतील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मित्रानेच केला मित्राचा खून!

## तीन आरोपींना नवी मुंबईतून अटक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

'कॉमन गर्लफ्रेंड'च्या वादातून एका तरुणाला बेसबॉल स्टिकने मारहाण करून त्याचा खून केल्याची घटना घोलेनगर परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी तीन आरोपींना नवी मुंबईतून अटक करण्यात आली असून हल्लेखोर मृत तरुणाचे जवळचे मित्र असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

हर्षल महेंद्र जाधव (२४) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणात अभिषेक पवार, प्रथमेश धोत्रे आणि मारुती देवकर या तिघांना अटक करण्यात आली आहे. हर्षल आणि आरोपी मित्र आहेत. त्यांच्यामध्ये गेल्या सहा महिन्यांपासून एका तरुणीसोबतच्या प्रेमसंबंधांवरून वाद सुरू होता. त्यातून दोन दिवसांपूर्वी हर्षलने मद्यधुंद अवस्थेत आरोपींपैकी एका मित्राच्या घरी जाऊन गोंधळ घातला होता. त्याचा सूड घेण्यासाठी आरोपींनी हर्षलचा खून करण्याचा कट रचल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. गंभीर जखमी हर्षलला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. अधिक तपास सुरू आहे.

# कोपरखैरणेत धामणीला जीवदान



**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील सेक्टर १९ मधील एका सोसायटीच्या बाथरूमजवळ गारव्याच्या शोधात आलेल्या सुमारे साडेसात फूट लांबीच्या धामण जातीच्या सापाला सर्पमित्र सुरेश मल्हारी खरात यांनी शिताफीने पकडून जीवदान दिले. सकाळच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे सोसायटीतील नागरिकांमध्ये काही काळ घबराट पसरली होती, मात्र सर्पमित्राच्या वेळेवर मदतीमुळे कोणतीही हानी झाली नाही.

कोपरखैरणे येथील श्री रणादेवी माता उद्यानासमोरील शिवपूजा अपार्टमेंट, प्लॉट नंबर ५१ ए मधील ग्राउंड फ्लोअरवरील बाथरूमजवळ ठेवलेल्या सामानात शुक्रवारी सकाळी एक मोठा साप आढळून आला. उकाड्यामुळे गारव्याच्या शोधात आलेला हा साप सुमारे सहा ते सात फूट लांबीचा धामण जातीचा होता.साप दिसताच सोसायटीतील एका रहिवाशाने तातडीने उद्यानातील माजी माळी कामगार अविनाश पाटील यांना फोन करून माहिती दिली. पाटील यांनी क्षणाचाही विलंब न करता घणसोली येथील सर्पमित्र सुरेश मल्हारी खरात यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच खरात यांनी घटनास्थळ गाठले आणि अतिशय काळजीपूर्वक व कौशल्याने धामण जातीच्या सापाला पकडले. त्यानंतर या धामणीला घणसोली-महापे येथील गवळीदेव पक्षी अभयारण्यात नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले.

# प्रकल्पग्रस्तांच्या इमारतींना दिलेल्या नोटिसा तत्काळ मागे घ्या -आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई कार्यक्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या इमारतींना बजावलेल्या सुनावणीच्या नोटिसा तत्काळ मागे घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महापालिकेच्या परवानगीशिवाय उभारण्यात आलेल्या कथित अनधिकृत बांधकामांबाबत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १११/२०२२ दाखल करण्यात आली होती.



या याचिकेवर न्यायालयाने २५ जुलै २०२५ रोजी आदेश दिल्यानंतर संबंधित बांधकामांना सुनावणीच्या नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, मात्र ज्या इमारतींना नोटिसा दिल्या आहेत, त्यातील अनेक घरे स्थानिक प्रकल्पग्रस्तांची असून सुमारे ८० वर्षांपूर्वी शासनाकडून त्यांना मालमत्तापत्रके देण्यात आली आहेत, असे आमदार म्हात्रे यांनी निदर्शनास आणले. अशा इमारतींना नोटिसा बजावल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या विषयावर तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास स्थानिक रहिवाशांमध्ये नाराजी वाढून जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या हिताचा विचार करावा. संबंधित बांधकामांबाबत शासन स्तरावर योग्य मार्ग काढावा आणि ज्यांना नोटिसा बजावल्या आहेत त्यांच्यावरील कारवाईला तातडीने स्थगिती द्यावी, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# तळोजा एमआयडीसी: रोजगाराचे नवे केंद्र

पनवेल तालुक्यातील तळोजा एमआयडीसी ही नवी मुंबई परिसरातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत आहे. केमिकल, फार्मास्युटिकल, इंजिनिअरिंग, आयटी, लॉजिस्टिक यांसारख्या १००० हून अधिक कंपन्या येथे आहेत. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, रेल्वे, विमानतळ याच्या जवळ असल्याने कंपन्यांची ही पसंतीची जागा आहे.

तळोजा एमआयडीसीमुळे पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे भागातील हजारो तरुणांना रोजगार मिळाला आहे. आयटीआय, डिप्लोमा झालेल्या मुलांना येथे लगेच नोकरी मिळते. 'मेक इन इंडिया' आणि 'पीएलआय' योजनेमुळे अनेक नवीन कंपन्या येथे येत आहेत. फार्मा हब म्हणून तळोजा विकसित होत आहे. येथे औषधनिर्मिती, संशोधन आणि विकास यावर भर दिला जात आहे.

स्थानिक तरुणांसाठी येथे मोठी संधी आहे. पण त्यासाठी कौशल्य आवश्यक आहे. केमिकल, फार्मा कंपन्यांमध्ये काम करण्यासाठी 'सेफ्टी', 'गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिस' याचे ज्ञान हवे. आयटीआयमध्ये 'अटेंडंट ऑपरेटर केमिकल प्लांट' हा कोर्स करावा. पदवीधरांनी बी.फार्म, एम.फार्म, केमिकल इंजिनिअरिंग करावे. लॉजिस्टिक कंपन्यांमध्ये काम करण्यासाठी 'सप्लाय चेन मॅनेजमेंट'चा कोर्स करावा.

तळोजा एमआयडीसीमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारावे, जिथे उद्योगांच्या गरजेनुसार तरुणांना प्रशिक्षण दिले जाईल. 'अप्रेंटिसशिप' योजनेतून विद्यार्थ्यांना थेट कंपनीत कामाचा अनुभव मिळेल. 'स्थानिकांना प्राधान्य' या तत्त्वाची अंमलबजावणी कंपनी आणि शासनाने दोघांनी करावी.

एमआयडीसीतील कंपन्यांनी सीएसआर फंडातून परिसरातील गावांचा विकास करावा. शाळा, दवाखाने, रस्ते, पाणीपुरवठा यासाठी मदत करावी. वृक्षारोपण करावे. 'झिरो लिक्विड डिस्चार्ज' तंत्रज्ञान वापरावे, जेणेकरून कासाडी नदी प्रदूषित होणार नाही. तळोजा ते खारघर मेट्रो सुरू झाल्यामुळे कामगारांना प्रवास करणे सोपे झाले आहे. भविष्यात तळोजा एमआयडीसी हे 'स्मार्ट इंडस्ट्रियल टाऊनशिप' म्हणून विकसित होणार आहे. येथे कामगारांसाठी घरे, रुग्णालय, शाळा, बाजारपेठ अशी सर्व सुविधा एकाच ठिकाणी मिळणार आहेत.

तळोजा एमआयडीसी ही पनवेलच्या तरुणांसाठी 'लँड ऑफ अपॉर्च्युनिटी' आहे. योग्य शिक्षण, कौशल्य आणि मेहनत घेतली तर येथे कोणीही मोठे होऊ शकते. नोकरी करायची नाही, तर उद्योग करायचा असेल तरी तळोजा योग्य आहे. एमआयडीसीकडून छोटे भूखंड घेऊन ॲसिलरी युनिट सुरू करता येते. थोडक्यात तळोजा एमआयडीसी ही पनवेलची आर्थिक नाडी आहे. ती जितकी मजबूत होईल, तितकी पनवेलची प्रगती वेगाने होईल.

(साभार इंटरनेट)



# वाशीत उद्या योग सोहळा

## नागरिकांना सहभागाचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २१) वाशी येथील सिडको प्रदर्शनी केंद्रावर भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ६.३० वाजता होणाऱ्या या सोहळ्यात हजारो नवी मुंबईकर एकत्र येऊन योगाचा जागर करणार आहेत.

या विशेष कार्यक्रमात शहरातील नागरिक, विविध शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. योगाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचावे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजात रुजावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे क्रीडा समिती सभापती गिरीश कान्हा म्हात्रे यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योग चळवळीला बळ द्यावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन महापौर सुजाता सुरज पाटील यांनी केले आहे.




**उरण : नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाल्याने बुक स्टॉलवर शालोपयोगी साहित्य खरेदीसाठी विद्यार्थी व पालकांची गर्दी होत आहे.**

# ॲड. जीविता पाटील यांना राष्ट्रीय कार्यदर्पण सन्मान पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवन येथे आयोजित कार्यक्रमात सामाजिक कार्याची दखल घेत तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाउंडेशनच्या संस्थापिका ॲड. जीविता सूरज पाटील यांना 'राष्ट्रीय कार्यदर्पण सन्मान पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ संगीतकार कौशल इनामदार व आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त सुनील अगलावे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.



यावेळी कर्करोग शास्त्रज्ञ तथा विश्वशांती दूत डॉ. अजमद खान, जलसंपदा विभागाचे विशेष अधीक्षक डॉ. जे. के. महाडिक, कार्यदर्पणच्या संचालिका सलमान खान, नियोजक नासिर खान, बेंज हॉस्पिटल मुंबईचे चेअरमन डॉ. आबीद सय्यद, नाट्य-नृत्य दिग्दर्शक पंकज पांडाळे, तेजस्विनी फाउंडेशनच्या सहसचिव राखी विजय पाटील, सबइन्स्पेक्टर ज्योत्स्ना तायडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात महाराष्ट्रभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. ॲड. जीविता पाटील यांचा आजवरचा प्रवास संघर्षमय राहिला आहे. वयाच्या २१ व्या वर्षी पतीचे निधन झाल्यानंतर एकल महिला म्हणून मुलाचा सांभाळ करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

सध्या त्या अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आतापर्यंत ४८ अनाथ मुलींना शिक्षणासाठी दत्तक घेतले असून अनेक विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत रोजगाराचे प्रशिक्षण देऊन सक्षम बनविले आहे. एम.ए. बी.एड, एम.एस.डब्ल्यू., एम.फिल, एल.एल.बी., एल.एल.एम. या पदव्युत्तर पदव्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केलेल्या ॲड. पाटील सध्या डिप्लोमा इन कौन्सिलिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. अंगणवाडी सेविका, रिसोर्स पर्सन, फ्रंट ऑफिसर, समुपदेशक, पत्रकार, उत्कृष्ट निवेदिका तसेच अनेक शासकीय व निमशासकीय संस्थांच्या पदावर त्यांनी काम केले आहे. आजवर त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील एकूण १९२ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. कार्यक्रमाचे निवेदन अनघा जाधव यांनी, तर आभार प्रदर्शन एन. डी. खान यांनी केले.

# अवैध गावठी दारू निर्मितीचा अड्डा उद्ध्वस्त

## चेराठी-काळकाई जंगलात नागोठणे पोलिसांची कारवाई; १.२४ लाखांचा मुद्देमाल नष्ट





**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलिसांनी अवैध गावठी दारू निर्मिती व विक्रीविरोधात मोठी कारवाई करत नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चेराठी-काळकाई जंगल परिसरात दोन ठिकाणी छापे टाकून गावठी हातभट्टीचे अड्डे उद्ध्वस्त केले. या कारवाईत एकूण एक लाख २४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला.

शुक्रवार, दि. १९ जून रोजी प्राप्त झालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी, सहाय्यक फौजदार कृष्णा म्हात्रे, पोलीस हवालदार महेश लांगी, पोलीस हवालदार अथर्व पाटील, पोलीस शिपाई स्वप्नील भालेराव व त्यांच्या पथकाने चेराठी-काळकाई जंगल परिसरात सुमारे २५ किलोमीटर आत जाऊन अवैधरित्या सुरू असलेल्या गावठी दारू निर्मितीच्या अड्ड्यांवर धाड टाकली.

या कारवाईदरम्यान दोन ठिकाणी गावठी हातभट्टी दारू निर्मितीचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. पहिल्या ठिकाणी २० लिटर तयार गावठी दारू व १००० लिटर गूळ मिश्रित रसायन असा सुमारे ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. तर दुसऱ्या ठिकाणी २५ लिटर तयार गावठी दारू व १४०० लिटर गूळ मिश्रित रसायन असा सुमारे ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १०९/२६ व ११०/२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) अंतर्गत दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणाचा पुढील तपास सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस करीत आहेत.

# माथेरानमध्ये रस्तेकामांचा शुभारंभ

**माथेरान : प्रतिनिधी**

अनेक महिन्यांपासून प्रलंबित असणाऱ्या मुख्य रस्त्यापैकी अर्धवट स्थितीत राहिलेल्या पॉईंट व्ह्यू हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज रोड पर्यंतचा क्रे पेव्हर ब्लॉकच्या रस्त्याच्या कामाचा उद्घाटन कार्यक्रम दि.१६रोजी पांडे रोड येथे विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या शुभ हस्ते पार पडला.यावेळी

कार्यक्षम मुख्याधिकारी राहुल इंगळे, उपनगराध्यक्ष संतोष शेलार, गटनेते शिवाजी शिंदे,विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, नगरसेवक किशोर मोरे, बांधकाम सभापती गौरांग वाघेला, नगरसेवक सोहेल महापुळे, नगरसेविका प्रियंका कदम यांसह अन्य मान्यवर व स्थानिक रहिवाशी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माथेरानच्या विकासाला नेहमीच आडकाठी आणणाऱ्या मंडळींमुळे या रस्त्याचे काम मागील अनेक महिन्यांपासून अर्धवट राहिले होते.हाच मुख्य

रस्ता नगरपालिका कार्यालय,बी.जे रुग्णालय,सेंट झेव्हीयर हायस्कूल,गव्हाणकर हायस्कूल तसेच अनेक मोठ्या हॉटेल्स कडे जातो.त्याच बरोबर यारस्त्यावरून पर्यटक,स्थानिक नागरिक,ई-रिक्षा,प्रवासी घोडे आणि मालवाहू घोडे यांची सतत वर्दळ असते.एवढाच भाग मातीच्या रस्त्याचा असल्याने मोठ्या प्रमाणावर येथे धुळीचे प्रमाण वाढले होते.पावसाळ्यात या रस्त्याला तर नाल्याचे स्वरूप होते.या रस्त्यासाठी स्थानिकांची सातत्याने मागणी होत असल्याने अखेरीस विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी या रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी श्रीफळ वाढवून शुभारंभ केला आहे. याच बरोबर दस्तुरी येथील चेडोबा मंदिर ते दस्तुरी पार्किंग खालच्या रस्त्याच्या कामाचा देखील शुभारंभ करण्यात आला आहे.दोन्ही रस्त्यांच्या कामाचा येथे शुभारंभ झाला असून लवकरच कामाला सुरुवात होणार आहे.



# शिवसेना वर्धापन दिनी माणगावमध्ये युवासेनेतर्फे रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी शिवसेना - युवासेना माणगाव तालुका यांच्यातर्फे पक्षाच्या वर्धापनदिनी सुरु करण्यात आलेली रुग्णवाहिका सेवा अखंडितपणे सुरु राहील असे अभिवचन माणगाव येथील कार्यक्रमात मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

शिवसेना - युवासेना माणगाव तालुका आयोजित शिवसेना पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार दि.१९ जून २०२६ रोजी उपजिल्हा रुग्णालय माणगाव याठिकाणी रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा मंत्री भरत गोगावले व पक्षाचे कोअर कमीटी सदस्य विकास गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी मंत्री गोगावले यांच्याहस्ते श्रीफळ वाढवून रुग्णवाहिकेचा लोकार्पण करण्यात आला. या कार्यक्रमास तालुका प्रमुख अँड.महेंद्र माणकर,माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश मेहता,वैद्यकीय अधिकारी डॉ.संतोष कामेरकर,युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे,जेष्ठ नेते राजाभाऊ रणपिसे,महिला आघाडी जिल्हाप्रमुख नीलिमा घोसाळकर,सभापती विलास शिंदे,राजिप सदस्य दिनेश हरवंडकर,डॉ.परेश उभारे,तालुका युवासेना अधिकारी ज्ञानेश्वर





उतेकर,शहर संपर्कप्रमुख प्रसाद धारिया,शहर प्रमुख नितीन दसवते,सुधीर पवार,पंचायत समिती सदस्य रवींद्र टेंबे,निलेश केसरकर,जगदीश दोशी,सौरभ खैरे,महिला संघटिका अरुणा वाघमारे,फैमिद जामदार,प्रवीण बागवे,संदीप जाधव,पवन कोलवणकर,प्रफुल खरंगटे,रोहित रातवडकर,रफिक परदेशी,मन्नान पालेकर आदींसह शिवसेना - युवासेनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते,उपजिल्हा रुग्णालयाच्या परिचारिका,कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री भरत गोगावले पुढे म्हणाले कि,आमचे संपर्क प्रमुख अनिल नवगणे यांच्याकडे असणारी रुग्णवाहिका हि आपण सेवेत रुजू केली आहे. तालुका युवासेनेने या रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा आज आयोजित केला आहे. माणगाव हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून येथे असणाऱ्या उपजिल्हा रुग्णालयात वेगवेगळ्या आजारांचे रुग्ण उपचाराकरिता येत असतात. या रुग्णांना कधी अधिक औषधोपचाराकरिता एमजीएम रुग्णालय,जे.जे.रुग्णालय,सायन रुग्णालय याठिकाणी पाठविण्यासाठी रुग्णवाहिकेची गरज असते. हि गरज ओळखून शिवसेना पक्षाच्यावतीने युवासेनेतर्फे या रुग्णवाहिकेच्या लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. गोरगरीब जनतेसाठी अत्यंत कमी खर्चात हि रुग्ण वाहिका उपलब्ध करून देण्यात येईल. ज्या लोकांची आर्थिक परिस्थिती नसेल त्या लोकांना शिवसेना पक्ष संघटना मोफत रुग्णवाहिकेची सेवा देईल. माणगाव उपजिल्हा रुग्णालय हे गोरगरीब जनतेसाठी असून याठिकाणी ज्याकाही सुविधा आहेत याचा नागरिकांनी लाभ घ्यावा. रुग्णालयाच्या ज्या समस्या आहेत त्यादेखील सोडविण्याचा आपण प्रयत्न करू असे सांगत त्यांनी सोनग्राफी मशीनवर ऑपरेटरची व्यवस्था लवकरच केली जाईल, असे सांगितले.

# लाखाची कमाई देणाऱ्या अलिबाग-शेगाव बसच्या चालक, वाहकांचा गौरव

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग आगारातून धावणाऱ्या अलिबाग-शेगाव बससेवेने महसुलाचा नवा टप्पा गाठत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. १५ जून रोजी झालेल्या एका फेरीत या बसने तब्बल १ लाख १ हजार ४६२ रुपयांचा महसूल मिळवला. या यशामागे चालक सचिन बावस्कर आणि वाहक संदीप गोसावी यांचे परिश्रम महत्त्वाचे ठरले. या फेरीत बसचे १०७.८८ टक्के भारमान नोंदविण्यात आले. प्रवाशांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारीने



केलेली सेवा यामुळे हा विक्रम शक्य झाल्याचे सांगण्यात आले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल रायगड एसटी प्रेमी संघटनेच्या वतीने चालक आणि वाहक यांचा सत्कार करण्यात आला. एसटीच्या उत्पन्नवाढीत आणि प्रवाशांना विश्वासार्ह सेवा देण्यात त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

सत्कार कार्यक्रमाला अलिबाग आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांच्यासह रायगड एसटी प्रेमी संघटनेचे पदाधिकारी अमित कंटक, स्वप्नील भगत, संकेत पाटील आणि समीर रांजणकर उपस्थित होते. तसेच आगारातील कर्मचारी संदीप असलकर आणि रितेश पाटील यांनीही उपस्थिती दर्शवली.

एसटी सेवेच्या बळकटीकरणासाठी चालक-वाहकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, अशा यशस्वी कामगिरीमुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# कोएसो घोसाळे हायस्कूलचे मुख्याध्यापक कोकरे यांनी नवागतांचे गुलाबपुष्प देऊन केले स्वागत

**नागोठणे : बातमीदार**

रोहा जवळील घोसाळे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या घोसाळे हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवी व आठवीमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे नवनियुक्त मुख्याध्यापक बी.टी. कोकरे यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे चेअरमन प्रकाश धुमाळ, मुख्याध्यापक बी. टी. कोकरे यांच्यासह ज्येष्ठ शिक्षक धर्मेंद्र फुलपागरे, रोहीदास राठोड, अतुल पाडवी, दिवाळे मॅडम, हरीश बांगारे, लेखनिक शुभम शेलार, चतुर्थ श्रेणी कर्मचारी नरेश उघडा तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक कोकरे म्हणाले की, आपली शाळा ग्रामीण भागात वसलेली असून येथे



सर्वसामान्य तसेच विविध सामाजिक स्तरातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व असून प्रत्येकाने गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन आपले भविष्य घडवावे.

तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरित करताना त्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा, विविध शासकीय योजना तसेच इतर स्पर्धा परीक्षांची माहिती देऊन त्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचा विकास करून शाळेचे व पालकांचे नाव उज्वल करावे, असेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाला घोसाळे व परिसरातील इतर गावांतील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत समारंभ संपन्न झाला.

# अकॅडेमिया इंडस्ट्री मीट देणार उद्योग शिक्षणाला नवी दिशा!

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ डीबाटू, लोणेरे येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाच्या वतीने मंगळवार, दि. १६ जून २०२६ रोजी 'अकॅडेमिया-इंडस्ट्री मीट २०२६' या महत्त्वपूर्ण संवाद बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उद्योग क्षेत्र आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील सहकार्य अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध नामांकित उद्योगांतील तज्ज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि विद्यापीठातील प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.

हा कार्यक्रम कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत आणि अधिष्ठाता (शैक्षणिक) प्रा. डॉ. एस. एल. नलबलवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कुलसचिव डॉ. ए. पी. शेष यांच्या प्रशासकीय सहकार्याने पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित उद्योग प्रतिनिधींचे विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी



स्वागत व सत्कार केला. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. राजू पावडे यांनी मांडली, तर आयोजन सचिव डॉ. विकास सरगडे यांनी या बैठकीमागील उद्दिष्टे स्पष्ट केली.

यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. हेमंत व्हाटकर यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन व तांत्रिक क्षमतेची माहिती सादर करत विभागाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. या बैठकीत डीएमजी मोरी, सँडविक कोरोमँट, मास्टरकॅम, गोदरेज अॅस्टेक, एस मायक्रोमॅटिक, इलेक्ट्रॉनिका हाय-टेक मशीन टूल्स, ड्यूफ्लॉन इंडस्ट्रीज, सेटको स्पिंडल्स, टेक्विटी इंजिनिअरिंग, इंटरफेस डिझाइन, प्रीयुज पॉवर ट्रेन, सायबरनेटिक टेक्नॉलॉजीज, शार्पलाइन मशिनरी, ब्लूजेट हेल्थकेअर, प्रसोल केमिकल्स, ओडिसी ऑरगॅनिक्स, महाले ऑटोमेशन्स यांसह सुमारे २० उद्योगांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. उद्योग क्षेत्राला अपेक्षित असलेली अभियंत्यांची कौशल्ये, तांत्रिक ज्ञान, व्यावसायिक दृष्टिकोन आणि रोजगारक्षमतेसाठी आवश्यक बाबींवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

बैठकीदरम्यान अभ्यासक्रमातील आवश्यक सुधारणा, उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन व विकास क्षेत्रातील सहकार्य, कन्सल्टन्सी संधी, औद्योगिक प्रशिक्षण, इंटर्नशिप, स्टार्ट-अप्स, उद्योजकता विकास, कौशल्यवृद्धी कार्यक्रम आणि विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटच्या संधी यांसारख्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. अभियांत्रिकी शिक्षण अधिक परिणामकारक, आधुनिक आणि उद्योगांच्या गरजांशी सुसंगत बनविण्यासाठी उद्योग प्रतिनिधींनी उपयुक्त सूचना केल्या.

यावेळी उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी विद्यापीठातील अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधन सुविधा आणि विविध तांत्रिक विभागांना भेट देऊन उपलब्ध संसाधनांचा आढावा घेतला. संशोधन प्रकल्प, तांत्रिक सल्लागार सेवा आणि नवोन्मेषी उपक्रमांमध्ये भविष्यातील सहकार्याच्या संधींबाबतही चर्चा करण्यात आली. परस्पर संवादात्मक सत्रे आणि खुल्या चर्चांमुळे उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांना अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी आयोजित अभिप्राय सत्रात उद्योग प्रतिनिधींनी विद्यापीठाच्या या उपक्रमाचे कौतुक करत उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी विविध सूचना मांडल्या. डॉ. विकास सरगडे यांनी आभार प्रदर्शन करत सर्व उद्योग प्रतिनिधी, वक्ते, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि आयोजनात योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# मजगाव आदर्श शाळा येथे विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात

**मुरुड : प्रतिनिधी**

आदर्श शाळा, मजगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मुरूड पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. निलेशजी घाटवळ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत नियमित शिक्षण, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण अध्ययनाचे महत्त्व सांगितले. तसेच पालकांनी मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन केले.



विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या भेटीमुळे विद्यार्थी व शिक्षकवर्गाला प्रेरणा मिळाली.

शाळेच्या प्रगतीसाठी त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.त्यांच्या समवेत मुरुड गटाचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, प्रशासक प्रसाद माळी आणि साधन व्यक्ती चेतन पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापिका धुमाळ, शिक्षकवृंद बाळासाहेब फुंदे, स्वप्नाली बाजी, हर्षा नांदगावकर, संतोष दहातोंडे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चेतन चव्हाण यांनी केले. प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात झाली.

# कॅनडाकडून कताराचा धुव्वा

**व्हँकूव्हर : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील 'ब' गटात यजमान कॅनडाने घरच्या मैदानातील व्हँकुव्हर स्टेडियमवर कतारविरुद्ध सामन्यात ६-० अशा स्वप्नवत विजयाची नोंद केली. कॅनडाकडून जोनाथन डेव्हिड याने हॅट्‌ट्रिकचा डाव साधला. दुसरीकडे कतारच्या संघाला या सामन्यात दोन रेड कार्डसह स्वयंगोलचा फटका बसला. कॅनडाच्या संघाने वर्ल्डकपच्या इतिहासात याआधी फक्त एकमेव गोल केला होता. आता एकाच सामन्यात दणदण गोल डागत त्यांनी वर्ल्डकपमधील पहिला विजय अविस्मरणीय केला.

कॅनडाच्या संघाने या सामन्यात सुरुवातीला संयमी खेळ दाखवला, पण १६व्या मिनिटाला स्ट्रायकर सायल लॅरिन याने पहिला गोल डागत कॅनडाच्या संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर स्ट्रायकर तसेच लेफ्ट विंगरची भूमिका बजावणारा जोनाथन डेव्हिड पिक्चरमध्ये आला. त्याने २९व्या मिनिटाला आणि पहिल्या हाफमधील अतिरिक्त वेळत ४८व्या मिनिटाला असे दोन गोल मारत संघाला ३-० अशी आघाडी



मिळवून दिली. ९० मिनिटांच्या खेळानंतर मिळालेल्या अतिरिक्त वेळेत आपला तिसरा गोल डागत त्याने ऐतिहासिक सामन्यात हॅट्‌ट्रिकचा डाव साधला.

याशिवाय इस्माइल कोने याच्या दुखापतीनंतर त्याच्या जागी आलेल्या नेथन सलीबा याने ६४व्या मिनिटाला संघासाठी एका गोलचे योगदान दिले. हा गोल त्याने कोनेला समर्पित केल्याचेही पहायला मिळाले. ७५व्या मिनिटाला कतारच्या मोम्मद मोनाईने स्वयंगोलसह कतारच्या अडचणीत भर घातली अन् शेवटी कॅनडाच्या संघाने ६-० असा धमाकेदार विजय नोंदवत आपल्या गटात अव्वलस्थान गाठले.

### एका सामन्यात दोन रेड कार्ड

कॅनडाच्या संघाचे आक्रमण रोखण्याचे आव्हान असताना कतारच्या संघातील दोन खेळाडूंना रेफ्रींनी रेड कार्ड दाखवत मैदानाबाहेर काढले. पहिल्या हाफमध्ये ३३व्या मिनिटाला होमाम अहमदला सामन्यातील पहिले रेड कार्ड दाखवण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये ५३व्या मिनिटाला असीम माडीबो याला रेड कार्ड मिळाले. आधीच बॅकफूटवर असलेल्या कतारवर नऊ खेळाडूंसह खेळण्याची वेळ आली. याचा फायदा उठवत कॅनडाच्या संघाने वर्ल्डकपमधील पहिल्या सामन्यात मोठा विजय मिळवण्याचा डाव साधला.

या विजयासह यजमान संघाचा पुढच्या फेरीत प्रवेश करण्याचा मार्ग सोपा झाला आहे. उर्वरित दोन सामन्यात एक अनिर्णित सामनाही त्यांना पुढच्या फेरीत पोहचवेल.

# अक्षरा गुप्ताने वनडेत त्रिशतकासह रचला इतिहास

## वैभव सूर्यवंशीनंतर बिहारच्या लेकीची कमाल

**भागलपूर : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटमध्ये नवनवीन प्रतिभावान चेहरे समोर येत आहेत. १५व्या वर्षी वैभव सूर्यवंशीने आपल्या उत्तुंग फटकेबाजीने क्रिकेट जगताचे लक्षवेधून घेतले. आयपीएलमधील धमाकेदार कामगिरीने त्याने भारतीय वरिष्ठ संघात स्थान मिळवले. या गोष्टीची चर्चा रंगत असताना आता बिहारच्या अक्षरा गुप्ताने त्रिशतकी खेळीसह इतिहास रचला आहे. विशेष म्हणजे तीही वैभवप्रमाणेच डावखुरी फलंदाज आहे.

बिहारच्या अक्षरा गुप्ताने देशांतर्गत क्रिकेटमधील १९ वर्षांखालील एकदिवसीय सामन्यात नाबाद ३०६ धावांची खेळी करत आपल्या फलंदाजीतील खास धमक दाखवून दिली. या खेळीदरम्यान



तिने ५५ चौकार लगावले. षटकारांच्या बाबतीतही ती मागे राहिली नाही. विक्रमी त्रिशतकी खेळीत तिने तब्बल आठ उत्तुंग षटकारही ठोकले.

भागलपूरच्या सँडिस कंपाऊंड मैदानावर सुरू झालेल्या स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी अक्षरा गुप्ताने इतिहास घडवला. २३३ मिनिटे मैदानात तग धरून १२६ चेंडूचा सामना करताना अक्षताने २४२.८६च्या स्ट्राईक त्रिशतकी डाव साधला. या खेळीत तिने पहिल्या १६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केल्यावर ३४ चेंडूत शतकाला गवसणी घातली.

अक्षराने बीसीए महिला क्रिकेटमध्येही नवा विक्रमही बनला आहे. याआधी मुंबईच्या इरा गुप्ता हिने एका देशांतर्गत क्रिकेटमध्ये नाबाद ३४६ धावांची खेळी केल्याची नोंद आहे. इराने आपल्या डावात ४२ चौकार आणि १६ षटकार मारले होते.

# हर्षित राणाचा भारतीय संघात समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि अफगाणिस्तान या दोन



संघांमध्ये तीन वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली, तर मालिकेतील तिसरा सामना चेन्नईत खेळवला जाणार आहे. या सामन्याच्या एक दिवसाआधी भारतीय संघात मोठा बदल करण्यात आला आहे. हर्षित राणाचा संघात समावेश करण्यात आला आहे.

हर्षितने वनडे क्रिकेटमध्ये आतापर्यंत खेळलेल्या १४ सामन्यांमध्ये २६ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याची सरासरी २७.३८ची राहिली आहे, तर ३९ धावा खर्च करून त्याने चार गडी बाद ही त्याची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी राहिली आहे. कसोटी आणि टी-२०पेक्षा हर्षितने वनडे क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली आहे. आगामी वनडे वर्ल्डकप स्पर्धा पाहता त्याला सातत्याने भारतीय संघात संधी दिली जात आहे.

# स्वित्झर्लंडची बोस्नियावर एकतर्फी मात

**लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था**

फिफा फुटबॉल वर्ल्डकप स्पर्धेत अमेरिकेतील लॉस एंजेलिसच्या सोफाय स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात स्वित्झर्लंडच्या संघाने बोस्निया आणि हर्जेगोविना संघाचा ४-१ असा धुव्वा उडवला. पहिला हाफ गोलशून्य राहिल्यावर सामन्यातील अखेरच्या २२ मिनिटांत गोलवर्षाव झाला. त्यात स्वित्झर्लंडच्या संघाने एकतर्फी विजय निश्चित केला.

सामन्यातील ७४व्या मिनिटाला जोहान मंझाम्बी याने पहिला गोल डागत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पुनरागमनाचे आव्हान असताना ८०व्या मिनिटाला बोस्निया संघाला मोठा धक्का बसला. तारिक मुरमोविच याला रेफ्रींनी रेड कार्ड दाखवत बाहेरचा रस्ता दाखवला. या संधीचा फायदा घेत स्वित्झर्लंडकडून रुबेन वर्गास याने ८४व्या मिनिटाला संघासाठी दुसरा गोल डागला. ९०व्या



मिनिटाला मुंझाम्बी पुन्हा पिक्चरमध्ये आला. त्याने आणखी एक गोल डागत संघाची आघाडी ३-० अशी केली. ९० मिनिटांचा खेळ संपल्यावर मिळालेल्या अतिरिक्त वेळेतील ९३व्या मिनिटाला अर्मीन महमिक याने बोर्सिनयाकडून पहिला गोल डागला, पण त्यानंतर ९७व्या मिनिटाला ग्रनिट शाकाने पेनल्टीचे गोलमध्ये रुपांतरित केले अन् स्वित्झर्लंडने सामन्यात ४-१ अशी बाजी मारली.

या लढतीआधी दोन्ही संघ सलामीच्या सामन्यातील ड्रॉ सह मैदानात उतरले होते. स्वित्झर्लंडने मोठ्या विजयासह 'ब' गटात अव्वलस्थानी झेप घेत पुढच्या फेरीत जाण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

### मंझाम्बीची ऐतिहासिक कामगिरी

१० वर्षांपूर्वी जो मुलगा फॅन झोनमध्ये बसून स्वित्झर्लंडचे सामने पाहायचा त्या जोहान मंझाम्बी याने वयाच्या २०व्या वर्षी वर्ल्डकपच्या मैदानात उतरून इतिहास रचला. या सामन्यात त्याने दोन गोल डागले. सामन्यातील ७४व्या मिनिटाला पहिला गोल करत ७६ वर्षांत जे कुणाला जमले नाही ते मंझाम्बीने करून दाखवले. तो वर्ल्डकप स्पर्धेत स्वित्झर्लंडकडून गोल करणारा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. फॅन झोन ते वर्ल्ड कपचा हिरो हा प्रवास स्वप्नवत असाच आहे.

# स्टार फुटबॉलर इस्माईलला सामन्यादरम्यान दुखापत



**व्हँकूव्हर : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेत कतारविरुद्धच्या सामन्यात कॅनडाचा स्टार फुटबॉलर इस्माईल कोने याला गंभीर दुखापत झाली. कतारच्या संघातील खेळाडूशी झालेल्या टक्करनंतर इस्माईलच्या पायाचे हाड मोडले. त्याची दुखापत गंभीर असल्याने त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे त्याला स्पर्धेतून बाहेर व्हावे लागले.

सामन्याच्या दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला कतारचा मिडफिल्डर असिम मदीबो याने इस्माईल कोनेला रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोघांमध्ये जोरदार टक्कर झाली. यानंतर इस्माईल जमिनीवर कोसळला. तातडीने वैद्यकीय पथक मैदानात दाखल झाले आणि त्याची तपासणी करण्यात आली.

प्राथमिक वैद्यकीय अहवालानुसार इस्माईल कोनेच्या पायातील दोन्ही हाडे तुटल्याचे निष्पन्न झाले. दुखापत गंभीर असल्याने कोनेला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आले. तेव्हा स्टेडियममधील हजारो प्रेक्षक आपल्या जागेवर उभे राहिले आणि टाळ्यांच्या गजरात त्याला धीर दिला. तीव्र वेदना होत असतानाही कोनेने हात हलवून चाहत्यांचे आभार मानले.

इस्माईल कोने हा कॅनडाच्या संघाचा अत्यंत महत्त्वाचा मिडफिल्डर आहे. त्याच्या दुखापतमुळे कॅनडाच्या फिफा विश्वचषक मोहिमेत मोठी समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

# कोलंबियाचा उझबेकिस्तानवर दमदार विजय

**मेक्सिको सिटी : वृत्तसंस्था**

२०२२च्या कतार विश्वचषकाची संधी हुकल्यानंतर कोलंबिया संघाने पुन्हा एकदा फुटबॉलच्या सर्वात मोठ्या मंचावर दिमाखात पुनरागमन केले आहे. एस्टाडियो अझ्टेका स्टेडियमवर झालेल्या फिफा विश्वचषक २०२६च्या सलामीच्या सामन्यात कोलंबियाने उझबेकिस्तानवर ३-१ असा विजय मिळवला. स्टार खेळाडू लुईस डियाझच्या शानदार कामगिरीने या विजयावर शिक्कामोर्तब केले.

८०,८२४ प्रेक्षकांच्या उपस्थितीत खेळल्या गेलेल्या या सामन्यात कोलंबियाचे वर्चस्व दिसून आले. ४०व्या मिनिटाला लुईस डियाझने दिलेल्या अचूक



पासवर डॅनियल मुनोजने गोल करत कोलंबियाचे खाते उघडले. विश्वचषकातील आपला पहिला सामना खेळणाऱ्या मुनोजसाठी हा एक विशेष क्षण ठरला.

दुसऱ्या सत्रात उझबेकिस्तानने कडवी झुंज दिली. ६०व्या मिनिटाला फैझुल्लायेव अब्बोस्बेकने गोल करून सामना १-१ असा बरोबरीत आणला, मात्र पाच मिनिटांतच (६५व्या मिनिटाला) लुईस डियाझने आपली जादू दाखवली आणि गोल करत कोलंबियाला पुन्हा आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या शेवटच्या क्षणी (अतिरिक्त वेळेत) जॅमिंटन कॅम्पाझने तिसरा गोल करत कोलंबियाचा ३-१ असा विजय निश्चित केला.

या विजयामुळे कोलंबिया आता गट 'के'मध्ये अव्वल स्थानी पोहोचला आहे. याच गटातील पोर्तुगाल आणि काँगो यांच्यातील सामना १-१ने बरोबरीत सुटल्याचा फायदा कोलंबियाला झाला आहे. कोलंबिया पुढच्या गुरुवारी ग्वादालहारा येथे काँगोचा सामना करेल, तर उझबेकिस्तान ह्यूस्टन येथे ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या पोर्तुगाल संघाविरुद्ध मैदानात उतरेल.

# दुखापतग्रस्त श्रेयंका पाटील वर्ल्डकपबाहेर

## प्रेमा रावतला संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत खेळत असलेल्या भारतीय महिला संघाला मोठा धक्का बसला आहे. स्टार स्पिनर श्रेयंका पाटील दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडली आहे. नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात क्षेत्ररक्षणावेळी तिचा पाय मुरगळला होता. तिच्या जागी बदली खेळाडूच्या रूपात अनकॅप्ड प्रेमा रावत हिला भारतीय संघात वाइल्ड कार्ड एन्ट्री मिळाली आहे.

प्रेमा रावत ही इंडिया 'अ' संघासोबत इंग्लंडमध्येच आहे. या संघातून ती आता भारतीय वरिष्ठ संघात दाखल होईल. २४ वर्षीय लेग स्पिनर प्रेमाने आतापर्यंत एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही, पण डब्ल्यूपीएलमध्ये तिने आपल्या कामगिरीने सर्वांना प्रभावित केले होते.

गोलंदाजीसह उजव्या हाताची बॅटर प्रेमा उत्तुंग फटकेबाजी करण्याची क्षमता बाळगते. भारतीय संघाकडे प्लेइंग इलेव्हनमध्ये निवडीसाठी प्रेमा रावतसह राधा यादव हा आणखी एक पर्याय उपलब्ध असेल. त्यामुळे प्रेमाला थेट वर्ल्डकपमध्ये पदार्पणाची संधी मिळणार का? ते पाहण्याजोगे असेल.

# बेन स्टोक्स काउंटी क्रिकेट खेळणार

**लंडन :** इंग्लंड क्रिकेटचा स्टार ऑल राउंडर बेन स्टोक्स सध्या नाईट क्लब वादामुळे चर्चेत आहे. नाईट क्लब वादानंतर पुन्हा क्रिकेट मैदानावर परतण्यास तो सज्ज झाला आहे. काउंटी क्रिकेटमधून कसोटी कर्णधार पुनरागमन करणार आहे.

दरम्यान, स्टोक्सचा डॅरहॅम संघात समावेश करण्यात आला आहे. १९ जून रोजी नॉर्थहॅम्पटनशायरविरुद्ध होणाऱ्या काउंटी चॅम्पियनशिप सामन्यात तो मैदानात उतरणार आहे. या हंगामात डरहमसाठी खेळण्याची त्याची ही तिसरी वेळ असेल. विशेष म्हणजे हा सामना न्यूझीलंडविरुद्ध सुरू असलेल्या ओव्हल कसोटी सामन्यादरम्यानच खेळवला जाणार आहे.

# चेक संघाचा विजय हुकला, द. आफ्रिकेने वाचवला सामना



**अटलांटा : वृत्तसंस्था**

विश्वचषकातील गट 'अ' मधील महत्त्वाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिका आणि चेक रिपलिक यांच्यात १-१ अशी बरोबरी झाली. सामन्याच्या अखेरच्या टप्प्यात मिळालेल्या पेनल्टीवर तेबोहो मोकोएनाने गोल करत दक्षिण आफ्रिकेच्या बाद फेरी गाठण्याच्या आशा जिवंत ठेवल्या.

सामन्याच्या सुरुवातीलाच चेक संघाने आक्रमक खेळ करत आघाडी घेतली. सहाव्या मिनिटाला मिखाल सादिलेक याने अचूक फिनिश करत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर चेक संघाने अनेक संधी निर्माण केल्या, मात्र आघाडी वाढवण्यात त्यांना यश आले नाही.

दुसऱ्या हाफमध्ये दक्षिण आफ्रिकेने पुनरागमनाचा प्रयत्न सुरू ठेवला. सामन्याच्या ८३व्या मिनिटाला थापेलो मासेकोच्या शॉटला चेक बचावपटूच्या हाताचा स्पर्श झाल्यानंतर पंचांनी पेनल्टी दिली. या संधीचा फायदा घेत तेबोहो मोकोएनाने चेंडू जाळ्यात धाडत सामना १-१ असा बरोबरीत आणला.

या निकालामुळे दोन्ही संघांच्या खात्यात प्रत्येकी एक गुण जमा झाला आहे. आता गटातील पुढील फेरीत स्थान मिळवण्यासाठी दोन्ही संघांना आपले अखेरचे सामने जिंकणे जवळपास आवश्यक ठरणार आहे.

# युवराज पुन्हा आयपीएलमध्ये?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी स्टार अष्टपैलू आणि विस्फोटक फलंदाज युवराज सिंगचे पुन्हा एकदा आयपीएलमध्ये कमबॅक होणार असल्याची चर्चा आहे, मात्र यावेळी तो खेळाडू म्हणून नव्हे, तर प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे.

आयपीएलच्या आगामी हंगामासाठी दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने युवराज सिंगची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केल्याची चर्चा रंगली आहे. त्याचबरोबर सौरव गांगुली यांच्या खांद्यावर मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता आहे.

# पुढील आयपीएल लवकर होणार सुरू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६चा थरार संपल्यानंतर आता बीसीसीआयने आयपीएल २०२७च्या तयारीला सुरुवात केली आहे. उन्हाळ्याचा तडाखा आणि प्री-मान्सूनपासून बचाव करण्यासाठी आगामी २०वा हंगाम नेहमीपेक्षा लवकर म्हणजेच १० मार्चपासून सुरू होण्याची शक्यता आहे, अशी माहिती बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी दिली.

आयपीएल २०२६ स्पर्धा संपून काही दिवस उलटल्यानंतर बीसीसीआयने आगामी हंगामाची तयारी करायला सुरुवात केली आहे. क्रिकेट चाहते आयपीएलची




आतुरतेने वाट पाहत असतात. आगामी आयपीएल लवकर सुरू होईल. या स्पर्धेचे वेळापत्रक तर जाहीर करण्यात आलेले नाही, पण संभाव्य तारीख ठरली आहे.

आगामी आयपीएल २०२७ स्पर्धा लवकर सुरू होऊ शकते. या स्पर्धेची सुरुवात १० मार्चला होऊन स्पर्धेतील अंतिम सामना १५ मे रोजी खेळवला जाऊ शकतो.

उत्तर भारतात एप्रिल, मे महिन्यात उष्णतेचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे उन्हाचा तडाखा वाढून खेळाडूंना त्रास होत असल्याचे दिसून आले. म्हणूनच बीसीसीआयने पुढील आयपीएल लवकर सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी एका चर्चेदरम्यान ही माहिती दिली आहे.

### सामने तेवढेच राहणार!

आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू असताना अशी चर्चा रंगली होती की, आगामी हंगामात सामन्यांच्या संख्येत वाढ होऊ शकते. आतापर्यंत ७४ सामने खेळवले जात आहेत, ही संख्या ९४वर जाणार असे म्हटले जात होते, पण असे काहीच होणार नाही. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांच्या मते, १५ मेनंतर प्री मान्सून हंगाम सुरू होतो. यापासून वाचण्यासाठी आयपीएल लवकर संपवली जाणार आहे. लवकरच याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. आगामी आयपीएल हंगाम खास असणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com